म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : ......व्या.वा..
दा. क्र. : 3008

BVBK-0403009

बा. वा.
३००९
१०/८/९८

# देवाघरच्या फुलांनो

## साने गुरुजी

क्र. ३००९ दि. १०/८/९८
विषय बा. वा.

BVBK-0403009

राही - प्रकाशन, मुक्ताई, अमळनेर ( ४२५४०१ )
मूल्य रु. ३० /-

प्रकाशक : वा. रा. सोनार
राही - प्रकाशन, मुक्ताई, अमळनेर

© प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ती : ११ जून १९९४

अक्षरजुळणी : चैतन्य कॉम्प्यूटर्स
४२, भिकमचंद मार्केट, पहिला मजला,
जळगाव

मुद्रण : का. स. वाणी मुद्रणशाळा © २३६५४

# थोडेसे प्रास्ताविक

पू. साने गुरुजी अमळनेरच्या प्रताप विद्यालयात शिक्षक असतांना हायस्कूलच्याच आवारात राहात. विद्यार्थ्यांच्या छात्रालयाची देखभाल करण्याचे काम पू. साने गुरुजींवर सोपविलेले होते. गुरुजी आपल्या विद्यार्थी – शिक्षकांसाठी 'छात्रालय' या नावाचे दैनिक हस्तलिखित स्वरुपात प्रसिध्द करीत असत. पू. साने गुरुजी 'साधना' चे संपादक झाले. त्यांच्या या कर्तृत्वाचे बीज 'छात्रालय' दैनिकाच्या संपादनात आढळेल.

१९२८ - २९ सालात प्रसिध्द झालेल्या या 'छात्रालया' ची जीर्ण पृष्ठे भोपाळ येथील नामवंत, नुकतेच दिवंगत झालेले कै. प्रा. ना. ल. वैद्य यांचे संग्रही होती. त्यांचे नुकतेच साने गुरुजी चरित्र प्रकाशीत झाले असून, त्या पुस्तकात असा बहुमोल मजकूर

मूळ स्वरुपात जतन करून ठेवल्याचे नमूद केले आहे. त्यांना विनंती करताच गुरुजींच्या हस्ताक्षरातील मूळ प्रती हाती आल्या आणि त्यातूनच हे पुस्तक सिध्द होत आहे. याचे खरे सर्व श्रेय कै. प्रा. ना. ल. वैद्य यांना आहे. त्यांनी प्रस्तावना लिहिण्याचेही ठरले असतांना काळाने त्यांना हिरावून नेले. ही खंत मनास लागून राहिली आहेच.

यापूर्वी प्रकाशित न झालेल्या गुरुजींचे लेखन यानिमित्ताने प्रकाशित करण्याची संधी राही - प्रकाशनास मिळते आहे, हे फार मोठे समाधान आहे.

**वा. रा. सोनार**

* * *

# विविध विचार

## (१)

म. वा. सं. ठाणे, वाचनालय
क्र. ३००१ दिनांक १०।८।८४
ब्रा.वा.

एक लहान मुलगी एका वाद्य विशारदाजवळ एक तंतुवाद्य वाजविण्यास शिकत होती. ती मुलगी गुरुजीस म्हणाली, ''काय त्रास आहे. वाजवून वाजवून माझी बोटे दुखू लागली.'' हे तिचे संतापदर्शक शब्द ऐकून गुरुजी बोलले, ''बेटा घाबरू नकोस, कंटाळा करू नकोस आणि लक्षात ठेव 'तुझी बोटे' दुखत आहेत, त्या बरोबरच त्यांना रोज सवय होऊन ती बळकट पण होत आहेत.'' तेव्हा ती मुलगी म्हणाली,'' एकंदरीत जगात असे दिसते की दु:खाशिवाय बळ येत नाही. श्रमल्याशिवाय शक्ती मिळत नाही." Teacher, it seems that everything Which Strenthens, hurts" मुलीने सहज सांगितलेला सिध्दांत किती सत्य आहे! तुम्ही सर्वत्र दृष्टी फेका आणि तुम्हास असे दिसेल, त्रासाशिवाय सामर्थ्य

मिळाले नाही. तुम्ही थोर स्त्रीपुरुषांची जी निष्कलंक चरित्रे वाचलीत, त्या चरित्रात या थोर पुरुषास मानसिक वं शारीरिक सामर्थ्य, विशुध्द शील हे कोणी दिले? माती भाजली म्हणजे दगडाहून बलवान अशी वीट बनते. भाजल्याशिवाय भाग्य नाही. संकटांनी भाजून मने निघाली. म्हणजे ती कणखर व बळकट होतील. संकटांतून व अडचणीतून जिने आयुष्य नेले अशा एखाद्या साध्वी स्त्रीचे मुखमंडल देवदूताच्या सात्त्विक तेजासही लोपवील. तपश्चर्येने तेज मिळते. त्रास संकटे या शिवाय खरे सामर्थ्य अंगी येत नाही. भांडी घडवणारे हातोड्याने भांडे सारखे ठोकीत असतात. ठोकून ठोकून ते भांडे मजबूत होते. तसेच आपल्या आयुष्याचे आहे. उन्हातान्हांत काम करणारा मजूर उन्हातान्हांस भीत नाही. म्हणून लक्षात ठेवा की, सृष्टीचा असा कायदा आहे की, "Strength comes to you through Suffering" काट्यावर उभे राहावे लागेल जर गुलाबाप्रमाणे मिरवावयाचे असेल.

*　　　　*　　　　*

# ( २ )

एका पर्वताच्या उतरणीवरुन दोन प्रवाह खेळत उडत खाली येत होते. एक प्रवाह स्वत:शी म्हणाला 'आता या एकांताच्या जागीच बसून रहावे कोठे धावपळ करा व यातायात करा असे म्हणून त्याने आपणास एके ठिकाणी थोपवून धरले. तो पुन्हा म्हणाला 'मी येथे राहिलो म्हणून माझा उपयोग होणार नाही असे नाही. एखादा धाडसी प्रवासी या डोंगरावर रानावनात येईल. तो तहानेने त्रस्त होईल. मग माझ्या जवळ येईल. माझे हे थंडगार पाणी त्याला उत्साह व आनंद देईल मग पुनरपि तो वाटसरु वाट शोधू लागेल. अशा रीतीने चुकले भागलेले लोक माझ्याजवळ येऊन सुखी शांत होतील. माझ्याभोवती या चार भिंती मी बांधून घेतो-म्हणजे ते प्रवासी

आत येऊन बसतील' असा विचार करून तो प्रवाह तेथे आपल्या भोवती चार भिंती बांधून राहिला.

तो दुसरा दुसरा प्रवाह मनात म्हणाला, "मी येथेच या एकांतात कशास राहू? येथे मला ना धंदा ना उद्योग. येथे मला एकट्याला कंटाळा येईल. चला जाऊ डोंगराखाली आणि जगाची मजा पाहू." तो प्रवाह वाहू लागला, डोंगर सोडून तो खाली आला व पुढे पुढे डौलाने कधी हसत, कधी रागावत, कधी शांत गतीने तर कधी वायु वेगाने जातो आहे पहा. आपण चला त्याच्या बरोबर जाऊ. त्याच्या आजूबाजूला गवताचे गालिचे पहा पसरले आहेत. असे सुंदर हिरवे गवत दुसरी कडे कोठेही दिसत नाहीत. परंतु या ओढ्याच्या काठी मात्र बारा महिने ही हिरवी मखमल पसरलेली आहे. अरे हे पहा दुसरे छोटे मोठे प्रवाह या प्रवाहास राजा समजून आपला जलरूपी करभार देण्यास आले. या आमच्या प्रवाहाने सर्वास आपल्या पोटाशी धरले व पुढे चालला. प्रगति हेच त्याचे ध्येय. विश्रांतीचा त्याला कंटाळा आहे आता या मोठ्या प्रवाहाच्या बाजूस लहान गवत नसून मोठेमोठे तरुवर पहा रांगेने लागून राहिले आहेत. केवढाली बने व राने. काय ही शोभा! अशी सरळ गगनभेदी झाडे अन्यत्र तुम्हास दिसतात का? या प्रवाहास आता लोक नदी म्हणतात. हे पहा केवढाले मासे या प्रचंड प्रवाहात कसे चपलेप्रमाणे चमकत आहेत. ही पहा मोठमोठी धनाढ्य शहरे या नदीतटाकी वसत आहेत. या शहरात या नदीच्या पाण्याचा किती तरी कारखान्यांना व गिरण्यांना उपयोग होत आहे. तरी ही नदी पुढेच चालली आहे. अरे ही तर आता या अफाट समुद्रातून मिळाली. समुद्रास येणारी हजारो गलबते हिच्या मुखावाटे आत जात आहेत व व्यापार वाढत आहे. केवढे भाग्य आहे या प्रवाहाचे.

त्या पहिल्या प्रवाहाचे पुढे काय झाले पाहू या. तो पहा एक वाटसरु डोंगरातील रानात वाट चुकला आहे. तो इकडे तिकडे वणवण करीत आहे.इतक्यात स्वत:भोती भिंत बांधून घेऊन तेथेच डोंगराच्या बाजूस राहिलेला हा पहिला प्रवाह त्याला आढळला. तो पांथ मनात म्हणाला 'येथे विश्रांती मिळेल, तो पाणी पिण्यास म्हणून गेला व हातांत पाणी घेतो तो काय

नुसती शेवाळ-पिण्यासारखे शीत व मधुर पाणी त्या पांथस्थास मिळाले नाही.

सारांश त्या प्रवाहाप्रमाणे तुम्ही सतत पुढे जाणारे व्हा. कधी थांबू नका. A Life long stusent आजन्म विद्यार्थी, मरे पर्यंत काही तरी मिळविणारे व्हा. म्हणजे मग काही जन्मानंतर सर्व सद्गुण अंगी मिळवीत गेलात म्हणजे नदी इतरांस सुखवीत सुखवीत जशी सागरास मिळाली, त्या प्रमाणे तुम्ही पण सर्व विश्वास आपल्या जगण्याने रमवीत गुणरत्नाकर जो परमेश्वर त्यात जाऊन मिळाल. म्हणून त्यास एकलकोंड्या प्रवाहाप्रमाणे निष्क्रीय राहू नका. ते मरण आहे.

*　　　　*　　　　*

## ( ३ )

आईबापांचे आपणावर किती प्रेम असते. स्वत:स मिळालेली वस्तू आईबाप मुलांसाठी राखून ठेवतात. मुलगा दूर शिकावयास राहिला आणि घरी काही पक्वान्न किंवा चांगला पदार्थ केला असला तर घरच्या मंडळीस आई बापास मुलाची आठवण येते व आई म्हणते ''गोविंदास ही भाजी आवडत असे पण तो कोठे आहे आज येथे.'' घरी म्हैस किंवा गाय जर जनली तर आईबाप म्हणतात ''आज घरी असता तर दूध दही भरपूर खाल्ले असते मुलाने; परंतु आहे कोठे? अशा अनेक गोष्टी आईबापांचे प्रेम दाखवतात. परंतु मुले मात्र तितकेच प्रेम करतात असे नाही.

एकदा एका गरीब कुटूंबातील एक मुलगा आपला गांव सोडून ६ / ७ कोसावरील दुसऱ्या गावात हायस्कूलमध्ये शिकण्यास राहिला होता. मुलगा हुशार व प्रेमळ होता. तो सुटीत घरी आला म्हणजे आईस कितीतरी कामात मदत करावयाचा. मे

महिन्याची सुटी संपली होती व हा मुलगा पुन्हा शाळा सुरू झाली तेव्हा त्या गावात निघून गेला.

पावसाळ्याचे दिवस आले व पावसाची झड सुरु झाली. नद्यानाले भरून गेले. जिकडे तिकडे पृथ्वीजलमय दिसत होती. जणु पाण्यातूनच वर आली अशी ओलीचिंब झाली होती. पावसाळ्यात गायी म्हशी पुष्कळ वितात. आज आमच्या या गरीब मुलाच्या घरी एक गाय होती ती व्यायली होती. गायीला एक सुंदर पाडस झाले. गायीच्या चिकाचा घरात खर्वस झाला. परंतु गाय व्यायल्याबरोबर त्या मुलाच्या आईस मुलाची आठवण झाली. ती नवऱ्यास म्हणाली, ''हे पहा बाहेर पाऊस आहे व नद्यानाले भरले आहेत. तरीपण एक गोष्ट कराच. आपल्या रामूला खर्वस तर फार आवडतो. आज घरी असता तर! परतु त्याला उद्या तुम्ही खर्वस येथून घेऊन जा. चांगल्या वड्या पातेलीत घालून देईन. म्हणजे नीट नेता येईल.'' रामूचे वडील हे जरा अशक्त होते. घरची गरीबी म्हणून गाडी घोडे करण्यास त्यास ऐपत नव्हती. परंतु मुलावरचे प्रेम व बायकोने केलेली ही विनवणी यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान वगैरे करुन व थोडे जेवण करुन रामूचे वडील निघाले. एका हातात ती खर्वसाची पातेली व दुसऱ्या हातात छत्री असे ते चालू लागले. ६॥ कोस अंतर होते. १२ चे सुमारास ते त्या गावी पोचले व शाळेचा रस्ता त्यांनी धरला शाळेच्या बाहेर मधली सुटी होईपर्यंत ते थांबले मधली सुटी झाली व रामू वर्गाबाहेर आला. त्याच्याबरोबर त्याचे एकदोन मित्र होते. इतक्यात वडिलांची व रामूची दृष्टादृष्ट झाली. रामूने विचारले ''का, मध्येच आलात बाबा? एवढ्या पावसातून कशास आलेत.'' वडील म्हणाले ''बाहेर त्या झाडाखालच्या दगडावर बसू चल. येऊ दे, तुझे मित्र पण येऊ दे, तुला एक गंमत घेऊन आलो आहे. रामू व त्याचे दोघे जिवलग मित्र त्या झाडाखाली गेले. वडिलांनी पातेलीचे फडके काढले व आत पाहतात तो खर्वसाच्या सुंदर वड्या रामू म्हणाला, ''बाबा, एवढ्याचसाठी का मुद्दाम आलेत?'' वडिल म्हणाले ''होय आम्हास तुझ्याशिवाय खर्वस गोड लागेना. तिला तर

सारखी तुझीच आठवण यावयाची. म्हणून आलो. गायीचे वासरु चांगले आहे. मोठे.'' आईबापांची ही प्रीति पाहून रामूच्या डोळ्यात अश्रू आले. ते दुसऱ्यास दिसू नये म्हणून तो जरा दूर गेला व डोळे वगैरे पुसून आला.

आईबाप असे प्रेम करतात, त्या प्रेमाची फेड तर आपणास कधीही करता येणार नाही. परंतु शक्य तोवर आपण त्यास सुखी ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आईबाप मरण पावले म्हणजे मग तुम्हास समजून येईल की खरेप्रेम करणारे आता कोणीही नाही. म्हणून जो पर्यत ते जिवंत आहे तो पर्यंत त्यांचे मन दुखवू नका. कारण नाहीतर; मोठेपणी पश्चाताप होतो व वाटते 'त्या वेळेस आईबापास संतोष दिला असता तर परंतु त्या वेळी तर माझ्या हट्टी वर्तनाने त्यांच्या डोळ्यातून सतरादा टिपे काढली.'' असे पुढे म्हणण्याची पाळी येऊ नये. म्हणून आजच तुम्ही आपल्या आईबापास बहीणभावास संतोष व आनंद द्या.

*　　　*　　　*

## ( ४ )

All the thinking in the World does not bring us to thought. We must be abrobed in nature so that good thoughts come before us like free children of God and cry "Here we are" Gokhle

निसर्गात रमा म्हणजे विचार तुमच्या पुढे येऊन नाचतील विचार ही सृष्टीदेतेची मनमोकळी खेळणारी मुले आहेत.

*　　　*　　　*

Sympathy is the key that fits the lock of any heart

दुसऱ्यांची मने आपलीशी करुन घ्यावयाची असतील तर सहानुभूतीने त्यांच्याकडे आपण गेले पाहिजे. एखाद्या मुलास मी जर दरडावून विचारले तर तो आपले अंत:करण मजजवळ खुले करणार नाही. एखादा ऐटबाज पोषाख करुन गरिबांच्या झोपडीत गेला तर तो गरीब गोंधळून जाईल व तो आपले मन मोकळे करणार नाही. तुम्ही मुलाजवळ गोड बोला की तो सर्व सांगतो. ज्याप्रमाणे शाळेची कुलुपे उघडावयास एक Master Key असते, त्याप्रमाणे दुसऱ्यांचे हृदय दरवाजे उघडावयाचे असतील तर त्यांच्याकडे सहानुभूतीची यशस्वी किल्ली घेऊन जा. अंत:करणावर पडलेले दडपण, अंत:करणांवरील सामाजिक रुढी परंपरांचे दडपण सहानुभूती दूर करते एखाद्या झऱ्याच्या तोंडावरील पाषाण दूर केला, म्हणजे त्या झऱ्यांतील पाणी झुळझूळ वाहू लागते. त्याप्रमाणे सहानुभूतीने मनावरील भार दूर केला म्हणजे मनातील सर्व भावनांचे नूर बदलू लागतात. अंत:करणातील प्रवाह सुरु होतो. यासाठी ज्याला ज्याला जनमनांचे राजा व्हावयाचे असेल त्याने जनांबद्दल सहानुभूती बाळगिली पाहिजे.वॉशिंग्टन या थोरपुरुषाविषयी असे म्हटले आहे की 'He was the first in the hearts of men' लोकांनी हृदय कपाटे खोलली तर अमेरिकनांच्या हृदयमंदिरात वॉशिंग्टन पूजलेला दिसे. वॉशिग्टन यास हे वैभव कोणी दिले? त्याच्या मनात जो बंधुभाव होता त्याने दिले

ज्याच्या हृदयात दुसऱ्याबद्दल सहानुभूती खरोखरीची आहे, केवळ तोंडदेखली सहानुभूती नसून ज्या सहानुभूतीचा उगम अंत:करणाच्या गंगेत झाला आहे, अशी आंतरिक सहानुभूति ज्याच्या जवळ दुसऱ्यांबद्दल असते, त्यांचे वैभव त्यांचे भाग्य यास सीमा नाही. राजे, महाराजे, सम्राट यांचे वैभव त्यांच्या वैभवासमोर फिके पडते. एखादा सम्राट आपल्या राजधानीतून मिरवला तर

लोक त्याचे स्वागत करितात, परंतु हे स्वागत मनापासून नसते.हिंदुस्थानात राजपुत्र येतात, ड्यूकसाहेब येतात; त्यांची टोलेजंग स्वागते पण होतात. परंतु जनता काय वदते ''लागली आग देशाला। म्हणती करा स्वागताला॥'' ही स्वागते दंडुक्याच्या धाक - दडपशाने उभारलेली स्वागते होत.

*                    *                    *

# ( ६ )

# काहीही करा पण ते मनापासून

एका उपदेश करण्याऱ्या गृहस्थाने आपल्या मित्रांना पुढील प्रमाणे उपदेश केला. तो चांगला वाटल्यावरुन पुढे देत आहे.

''सतराशे विषयांचे वर वर ज्ञान असण्यापेक्षा थोड्याच विषयांचे पण संपूर्ण ज्ञान असणे हे अधिक चांगले. कोणत्याही विषयासंबंधी अर्धवट व मोडकेतोडके तुटपुंजे ज्ञान असल्यामुळे फायदा होण्याऐवजी पुष्कळवेळा घोटाळे मात्र उत्पन्न होतात. असल्या अर्धवट ज्ञानाची जगात स्तुति केली जाते हे खरे. अमक्या अमक्याला प्रत्येक गोष्टींचे थोडेथोडे ज्ञान आपले आहेच. असे प्रशंसापर म्हटलेले ऐकू येते. आपले ज्ञान अपूर्ण असते. कारण आपल्या शक्ती मर्यादीत असतात हे तर खरेच; तरी पण ज्या पध्दतीने आपण ज्ञानसंग्रह करून घेतो. ती पध्दतीही सदोष, घोटाळ्यांची, अस्पष्ट अशी असते. काहीतरी बेजबाबदारपणे आपण करतो. आपल्या डोळ्यांना नीट न्याहाळून पाहण्याचे शिक्षण आपण देत नाही. कानांना नीट ऐकण्याची शिस्त आपण लावीत नाही. आपले बोलणे पुष्कळवेळा बेपर्वाईंचे आणि फुगवून सांगितलेले

असे असते; म्हणजे बोलण्याची शिस्त आपणास नसते. यामुळे आपल्या ज्ञानेंद्रियांस नीट वळण नसल्यामुळे ते घडते.

*　　*　　*

# ( ७ )

## मीं

छात्रालयातील विद्यार्थ्यांच्या गुणदोषांबद्दल आजपर्यंत दैनिकांत बरीच माहिती आली आहे. परंतु छात्रालयातील विद्यार्थी साधारणपणे ज्यांच्या हाताखाली आहेत व मुख्यत्ये करुन ज्यांची देखरेख आहे असा सर्वांचा समज आहे. त्याचे गुणदोष शिष्टाचारामुळे संपादक लिहू शकत नाहीत. सबब ते मीच स्वत: जरुरीपुरतेच देतो. दोष सांगितल्यामुळे ज्याप्रमाणे स्वत:ची निंदा करावी असा माझा हेतु नाही तसेच काही गुण सांगून मी आत्मस्तुति करावी अशीही माझी ईच्छा नाही.

मी कडक शिस्तीचा भोक्ता आहे. व सर्व विद्यार्थ्यांनी छात्रालयाचे सर्व नियम पाळावेत याजबद्दल माझा फार कटाक्ष आहे. कोणत्याही स्वतंत्र देशांतील लोकांना विद्यार्थी दशेतील काळ फार शिस्तीत घालावा लागतो. आपल्याकडे पूर्वीची शिस्त मोठमोठ्या गुरुकुलात होती. रोज थंड पाण्याने सूर्योदयापूर्वी स्नान करणे व सन्ध्या वन्दन करणे, नमस्कार घालणे. व रोज बरीच स्तोत्रे म्हणून नंतर सतत २ तास ३ तास (तास लघवीची सुटीत न घेता) वेद पठण करणे, हे आपले वरिल शिस्त शिकण्याचे मार्ग असत. पाश्चात्य देशात लष्करी शिक्षण प्रत्येक विद्यार्थीस इतके कडकपणे दिले जाते. आपल्या बोर्डिंगमधील शेकडा ७५ विद्यार्थ्याला त्या शिस्तीत १५ दिवसात मेटाकुटीस येतील. येथील छात्रालयात अत्यंत थोडे नियम आहेत की जे विद्यार्थाला जाचक

होतात. सध्याच्या परिस्थितीत यापेक्षा कमी कडक नियम करणे शक्य नाही. मी स्वत: अशा प्रकारच्या शिस्तीतून गेलो नसल्यामुळे मला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. विद्यार्थ्यांना नियम घालून देतांना तो नियम मी स्वत: पाळतो आहे किवा नाही या बद्दल मनात विचार येत नाही असे नाही पण खटपट करुनही जुन्या गैरसवयीचा इतका पगडा बसतो की केव्हा केव्हा प्रकृतीस अपायही होतो व मग तो नियम पाळण्याचे सोडून द्यावे लागते. त्या मनातील झटापटी विद्यार्थ्यास कशा कळाव्यात? सकाळी उठण्याच्या बाबतीत वयाच्या ३५ व्या वर्षापासून सालोसाल निदान १/२ महिने खटपट केली. दरखेपेसे त्याचे आजारात रुपांतर झाले. नियमाची उपयुक्तता पटली नाही. म्हणून नव्हे तर शरीर दुर्बलतेमुळे नेहमी माघार खावी लागत असे. माझ्यासारखा खमक्या पालक जर मला मिळाला असता तर किती बरे झाले असते. असे आता मला पश्चात्तापपूर्वक वाटते. विद्यार्थीदशेत या सवयी लवकर बिनत्रासाने जडू शकतात. ईच्छा मात्र पाहिजे. त्या सवयींचा उपयोग इतका आहे की ज्या दिवशी मी लवकर उठतो त्या दिवशी मला दिवसाचे २८ तास आहेत असा भास होतो व काम किती होते याची कल्पनाही इतरास करवणार नाही.

या शिस्तीच्या फायद्यामुळे ती न पाळणाऱ्या विद्यार्थ्यावर मी केव्हा केव्हा जरुरीपेक्षा अधिक रागावतो हा माझा दोष आहे पण त्याचे कारण विद्यार्थीही काही अंशाने आहेत. जे विद्यार्थी मनापासून नियम पाळण्याचा प्रयत्न करतात त्यांच्या वर मी क्वचितच रागावतो. तथापि यावर उपाय म्हणजे ज्यावेळी विद्यार्थ्यास वाटेल की मी अवास्तव त्याच्यावर रागावतो आहे त्या वेळी मजपासून त्याने आपल्या खोलीत धूम ठोकावी व पुन: काही वेळाने ''गुरुजी, रागावणार नसला तर सांगतो अशी सुरुवात करुन आपली बाजू मांडावी व मग काय तो निकाल घ्यावा.''

मला दुसरी सवय चहा पिण्याची. माझ्यामते ती सवय मला नाहीच आहे. दिवसानुदिवस मी चहा शिवाय राहलो आहे. व आजही राहू शकेन. पण निरनिराळ्या कामांमुळे इतकी गळ

पडते की ज्यांच्या घरी मी जातो त्यांना दूध देण्याचे थोडेफार संकटच पडते. पुन: काही लोक ''ओहोरे...'' म्हणून हिणवण्यास तयारच. हे चहा घेण्याचे एक कारण. इतरही थोडी फार विद्यार्थ्यास न कळण्याजोगी कारणे आहेत.

आता सांगतो गुण :- प्रथमत: विद्यार्थीदशेतले. मी फार गरीब विद्यार्थी होतो व वार लावून मी अध्ययन केले आहे. नेहमी नादार असे. पण वह्या पुस्तके यांना लागणारा पैसा मी पाणी भरून मिळवीत असे. कर्नाटकात धारवाड नावाचे गाव आहे. तेथे पाण्याची फार टंचाई. रोज एक घागर एखाद्याकडे एक महिनाभर घातल्यास महिन्याचे ८ आणे मिळायचे. पाण्याची घागर निदान अर्ध्या मैलावरून आणावी लागत असे.

मी वर्गात जरी हुषार नाही तरी व्यवस्थित विद्यार्थी होतो. रोजचे पाठ रोजच्या रोज करून, योग्यवेळी त्यांना पुन: उजळणी देत असे. कोणतीही परीक्षा मी टाळली नाही. कॉलेजमध्ये आल्यावर शेकडा ५० विद्यार्थी सहामाही परीक्षेची अळंटळं करतात कॉलेज मध्ये सुद्धा इंग्रजी व संस्कृत सारखे विषय मी आगाऊ वाचून जात असे. त्यामुळे माझ्यापेक्षा बुध्दिमान विद्यार्थ्यापेक्षा मी वर येत असे. शंका आल्याबरोबर ती योग्य अशा इसमास विचारून ती फिटल्यावर मग पुढचा अभ्यास करीत असे.

आता मोठेपणचे गुण :- मी अमळनेरला आल्यावेळी एका कॉलेज मध्ये प्रोफेसर होतो. पण विद्यार्थ्यांकरिता काहीतरी करावे या हेतूने मला काही मंडळींनी येथे बोलावले व आलो. माझ्याबरोबरचे लोक त्याच कॉलेजमध्ये उच्च पदावर आहेत. त्याशिवाय इतर मानमरातब. त्यांच्याबद्दल मला दु:ख होते असे बिलकूल नाही. उलट त्यांच्या पोकळ अभिमानाबद्दल मला कीवच येते गुलाम राहून पुन: मोठेपणा मिरवितात!

येथे आल्यावर ही माझ्या प्रोफेसरांनी मला सरकारी प्रोफेसरीची नोकरी देऊ केली होती पण मी नाकारल्यावर ती दुसऱ्यास दिली. त्याला सध्या ४५०रु. पगार आहे.

माझ्या उत्पन्नापैकी शेकडा ३० रु. मी दानधर्मात खर्च करतो. दरसाल निदान ४ मराठी पुस्तके व ४ मासिके विकत

घेतो.

रोज रोज थोडा वेळ तरी ईश्वराची मनोभावे आराधना करतो.

माझ्या बुध्दी प्रमाणे ज्यात मुलांचे कल्याण आहे अशा प्रकारचे शिक्षण मी मुलास वर्गात व बाहेर देतो. अंथरुणावर खिळून असलो तरच शाळेत शिकविण्यास मी जात नाही. केव्हा केव्हा अंगात ताप ठेवूनही मी शिकविलेले आहे.

**माझी "लहर" सांभाळून वागण्याची युक्ति सांगतो.**

१) वर्गात शिकविलेले न समजल्यास ताबडतोब विचारणे. अर्धा पाऊण तास अनेक गोष्टी सांगितल्यावर "रामायण वाचून रामाची सीता कोण" हा प्रश्न विचारल्यावर जितका राग यावा तितका राग येतो. वर्गात लक्ष नव्हते हे कारण असल्यास ते स्पष्ट सांगावे.

२) छात्रालयातील मुख्यत्त्वेकरून खालील नियम मोडल्यास मला फार राग येतो. केव्हा केव्हा राग निष्कारण असतो हे मला नंतर कळते.

अ) वरचेवर घरी जाण्याची परवानगी मागणे. त्याने माझे फारच पित्त खवळते.

आ) प्रार्थनेस न जाणे इ) शाळा चुकविणे, फार तुंबणे (ह्याही बाबतीत विद्यार्थांनी जितकी खटपट करायला पाहिजे तितकी ते करीत नाहीत असे मला वाटते.)

ह्या पैकी कोणतीही चूक केल्यास माझे रागावणे बोलावणे मुकाट्याने सहन करणे. तो वेळ गेल्यावर हळूच सांगावे की "तुम्ही निष्कारण रागावला." इतकेही करुन मी केव्हा रागातच 'हूं' म्हणतो पण तिकडे लक्ष देऊ नये. विद्यार्थ्याची चूक नसल्याचे आढळल्यास माझ्या रागाचा पारा १०० पासून १० वर एकदम येतो व तो १० वरचा शून्यापर्यंत येण्यास थोडा वेळ लागतो. असो. सध्या एवढे पुरे. राग कमी करण्याची सतत खटपट चालू आहे.

* * *

( ८ )

# निसर्गाशी संवाद

कवी हे निसर्गाचे सृष्टीचे संदेश सांगणारे दिव्यदृष्टी महात्मे आहेत. सर्वच कवीस सृष्टीच्या अंतरंगात शिरता येत नाही. ही देणगी थोड्या थोर कवीस दिली असते. हिंदुस्थानातील कविसम्राट रविंद्रनाथ यास ही ईश्वरी देणगी श्रेष्ठ प्रकारची आहे.

एकदा त्यांच्या शांतिनिकेतनातील खोलीतून ते बाहेर पडले व दुसरीकडे जात होते. ते बाहेर पडले तोच प्रचण्ड वारे सुटले. झाडे पडावयाची वेळ आली; प्रलय झाला असे भासले. परंतु रवींद्रनाथ भितीने घरात येऊन खोलीत पांघरुण घेऊन बसले नाहीत. ते सृष्टीचे लाडके बाळ आहेत. भीषण सृष्टीची त्यांस भिती वाटत नाही. रागावलेल्या आईस मूल भित नाही.आई मारीत असली तरी लहानमूल तिच्याच ओटीत तिच्याच लुगड्यात तोंड खुपसतो. सृष्टिमाता वाऱ्याच्या प्रचण्ड रुपाने पर्जन्याच्या भीषण दर्शनाने, विजांच्या कल्लोळाने कवि बाळास भिववू शकत नाही.

ज्या वेळेस वारे वगैरे सुटले, त्यावेळेस रवींद्रनाथ तेथेच रस्त्यात खाली बसले. त्यांनी डोळे अर्धवट मिटले होते. बराच वेळ झाला. सायंकाळ संपून रात्र होण्याची वेळ आली. रवींद्रनाथांच्या शिष्यांनी दिवे लावून आणले व ते गुरुदेवांच्या जवळ उभे राहिले. शेवटी रवींद्रनाथ उठले एक शब्दही ते बोलले नाहीत. भावनांनी हृदय भरलेले असले म्हणजे मनुष्य फार बोलू शकत नाही.

थेट आपल्या खोलीत रवींद्रनाथ गेले. त्यांनी कागद घेतला. त्या कागदावर सुंदर गीत त्यांनी लिहिले. जे संदेश सृष्टीने त्यास दिले ते त्यांनी लोकांस सांगितले सृष्टी शतमुखांनी

त्यांचेजवळ बोलत असते. खरा कवी स्वत:चे काही सांगत नाही. तो निसर्गाशी एकरुप होतो व निसर्ग त्याच्या मधून बोलत असतो.

परंतु असे कवी फार थोडे हे सांगावयास नकोच.

*　　　　*　　　　*

## ( १ )

मनुष्य प्राण्यांचे शरीर व इतर पशुपश्यांची शरीरे यात किती तफावत. तुमचे हातपाय तुम्हास वाटेल तसे फिरवता येतात. तुमची वाणी हे केवढे अपूर्व साधन आहे. प्रत्येक वस्तूस निराळा शब्द तुमच्याजवळ आहे तर पशू एकच शब्द सारखा काढतो. शिवाय तुम्हांस बुध्दी दिली आहे. तुम्ही विचार करु शकता व म्हणून तुम्हास प्रगती करून घेता येते. म्हणूनच साधुसंत नर जन्माची महती गातात. चौऱ्यायशी लक्ष योनीनंतर हा मनुष्य जन्म येतो. त्या दिवशी ज्या स्थितीत असतो, त्याच स्थितीत तो पशु मरतो. शरीर फारतर त्यांचे पुष्ट होते. सुधारणा करणे नराचा नारायण होणे हे मनुष्यासच साधेल व त्यासाठी त्याने या शरीराचा बुध्दिचा उपयोग केला पाहिजे, काम केले पाहिजे. तुम्हास माहिती आहे की वस्तूचा उपयोग करणे म्हणजे वस्तु जिवंत ठेवणे होय. चाकू तरवार यांचा उपयोग न केला तर त्यास गंज चढतो, त्या कुचकामाच्या ठरतात, त्याप्रमाणे तुमचे शरीर मन शरीर नेहमी उपयोगात आणले तर ते चपळ व उत्साही बनेल; तसेच मन व बुध्दी म्हणून शरीर व मन यांनी नेहमी काम करीत जा. दुसरे असे आहे की पशुपक्षी यांना जशी स्वत:ची सुधारणा करता येत नाही. त्याच प्रमाणे जास्त अधोगतीही त्यास करता येत नाही. परंतु मनुष्याचे मन व बुध्दी त्याची उन्नति करु शकतात, त्याप्रमाणे अधोगती व पशुपेक्षाही नीच त्यास करतात, वाघ भूक लागेल

तेव्हाच तो दुसरा प्राणी मारील. परंतु मनुष्य केवळ सूडबुध्दीनेही मारील. 'Saton finds to do mischief with the hands" जो काही उद्योगात मग्न नाही, त्याचे मन सैतान वाईट गोष्टीकडे वळवितो. तो व्यसनी होतो; दारु पितो, विडी ओढतो. कसा तरी• काळ घालविण्यात व्यसनात दंग होतो. यासाठी विचार करुन नेहमी कार्यमग्न रहा. त्यात प्रगतीचे बीज आहे.

मुलांस नेहमी वाटते की आपण हुशार आहो. काय करावयाचे आजपासून वाचून. परीक्षेच्या वेळी जरा आधी दोन दिवस वाचले म्हणजे पास होईन. आहे काय त्यात माझ्या हातचा मळ आहे. परंतु मित्रांनो हा फाजील आत्मविश्वास नाशास कारणीभूत होतो. कासव आणि ससा यांची गोष्ट तुम्हास माहितच आहे. आयुष्याच्या या संग्रामात साधारण बुध्दीचा, परंतु चिकाटीचा उपयोग व सततोद्योगी मनुष्यच यशस्वी होतो. हे लक्षात धरा. जर तुम्ही बुध्दिमान व जास्त हुशार असाल तर मठ्ठाइतके श्रम त्या विषयावर घेऊ नका. परंतु अधिकस्य अधिक फलं हे लक्षात धरा किंवा दुसऱ्या अनेक विषयांचे ज्ञान मिळवा.

या तुमच्या आयुष्यात जे तुम्ही मिळवाल ते मोलाचे आहे. आज भावी आयुष्याचा पाया तुम्हास घालावयाचा आहे. सर्व विषयात ज्ञान मिळवा. केवळ परीक्षेस महत्त्वाचा या दृष्टीने पाहू नका. ज्या ज्या गोष्टीमुळे जीवनास रमणीयता व विविधता आणता येईल ते ते शिका. गाणे, चित्रकला, खेळ, कवाईत, भूगोल, वगैरे सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तुम्हास Aesthetic Sense असला पाहिजे. चित्र पाहिले तर चित्रातील खुमारी समजली पाहीजे. तुमची खोली, बैठकखाना, घराचे आजूबाजूचे वातावरण कसे सजवावे, प्रसन्न करावे हे तुम्हास पुढील आयुष्यात समजले पाहिजे. या वेळेस भरपूर वेळ तुमच्याजवळ असतो. मिळवाल तेवढे थोडे आहे. भरपूर मिळवा सर्व ज्ञानप्रांतात घुसा, पूर्वी इग्लंडमध्ये एक राजा होता. तो आजूबाजूच्या प्रधानास उमरावास, वृध्दास सलाम करीत नसे, तर कोणी तरुण मनुष्य आढळला तर त्यास नमस्कार करी, याचे कारण एकाने राजास विचारले,

तेव्हा राजा म्हणाला "हा प्रधान हा सरदार, हा वृध्द मनुष्य यांची योग्यता मला कळून चुकली आहे. हल्ली आहेत याच्याहून ते मोठे खचित होणार नाहीत. परंतु ही तरुण मुले यांच्यात कोणत्या शक्ति निद्रित आहेत हे मला काय माहीत? कदाचित ही मुले थोरांहून थोर, राजांचेही राजे, शूरांचेही शूर होतील" आज तुमच्यात मुलांचे वाटेल ते होण्याची शक्ती आहे. परंतु काम करा. बुध्दि व शरीर यांचा उपयोग करा.

परंतु लक्षात ठेवा काम मर्यादेच्या बाहेर जाता कामा नये. विश्रांतीची पण कामाइतकीच जरूरी आहे. नेहमी काम करीत राहण्याने तुम्ही थकाल. म्हणून खेळा. नीट विश्रांती घ्या. म्हणजे जास्त उत्साहाने काम कराल. विश्रांती उत्तम प्रकारची घेण्यास आपण काम विसरले पाहिजे. To forget Work is to be better Prepared for work एखादा कारकून घरी गेला आणि कचेरीतीलच सगळ्या गोष्टी हिशोब वगैरे मनात घोळवीत राहिला तर त्याला मुलाबाळांजवळ धड बोलता येणार नाही. त्याला विश्रांती मिळत नाही. पुन्हा ऑफिसात गेल्यावर घोटाळा. तर क्रिडांगणावर आलेत म्हणजे अभ्यास विसरा. अभ्यासाचे वेळी खेळ विसरा. आपले मन एकदम वाटेल त्या गोष्टीस तयार करणे ही मोठी कला आहे. नेपोलियन रणांगणावरही झोपे. तो म्हणे "मी एकदा अमूक करावयाचे ठरविले म्हणजे कोठेही मला तसे करता येते; लढाईच्या धूमधडाक्यात निजावयाचे मनात आणले तर लगेच मला झोप लागते. व ती इतकी गाढ की पंधरा मिनिटांच्या झोपेनेही मी ताजा तवाना होतो.

असो तर विश्रांती घ्या. विश्रांती घेण्याचे निरनिराळे प्रकार आहेत. ग्लॅडस्टन सारखे मोठेलोक, एक काम सोडून दुसऱ्या कामात मग्न होतात. ही त्यांची विश्रांतीच होय. मोठ्यामोठ्या लोकांना दोन दोन तास खेळण्याची विश्रांती घेता येत नाही.

*　　　*　　　*

## ( १० )

# गणपती उत्सव

आज चार पाच दिवस भगवंताची आम्ही पूजा केली. भूतलावरील पूजा स्वीकारुन देव आपल्या स्वर्गात जावो. आमचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी पुन्हा आमच्याकडे येवोत.

काल मंगलमूर्ती मोरयाचे आपण विसर्जन केले. आज पाच सहा दिवस आनंदाने गेले. व्याख्याने, प्रवचने कीर्तने, भजने, मेळे, मेजवानी, खेळ खिरापत यांची खैरात लयलूट आज पाच दिवस झाली. प्रत्येकाच्या मुखमंडलावर आज आठवडाभर आनंद नाचत होता. आज आठवडाभर लहान थोर ऐक्य आनंद प्रेम मैत्री परस्पराबद्दल दाखवीत होते. आपण सर्व गुण्यागोविंदाने व आनंदाने राहिलो.

मांगल्याचा अवतार मोरेश्वर काल निघून गेला. परंतु त्याने मनावर घडलेले मांगल्याचे संस्कार आपण विसरता कामा नये. ते संस्कार पुढील वर्षी मोरया येईपर्यंत दृढतर होऊ द्या. ऐक्य व मैत्री, स्नेही व सलोखा पडेल ते काम करण्याची तयारी यांचे बहुमोल धडे आपण विसरता कामा नये. मोरया गेला परंतु काही तरी देऊन गेला आहे. ते दिलेले, देवाने ते दिलेले, दिलेला हा सद्विचारांचा ठेवा आपण दूर भिरकावून देता कामा नये.

पुढील वर्षी पुनरपि आपण गणेश देवास, या सिध्दि विनायक विघ्नेश्वरास पुन्हा आणू. परंतु ह्या वर्षापेक्षा पुढील वर्षी आपल्या मनाची वाढ, हृदयातील सद्भावनांची वाढ, बुध्दीची वाढ व शारीरिक बलाची वाढ आपणास त्यास दाखविता आली

पाहिजे. आपल्या मनावर जे आज संस्कार घडले त्या संस्कारास अनुसरुन आपण काय केले त्यांचा सर्व हिशेब गजाननापुढे मांडला पाहिजे.

नाहीतर पुढील वर्षी गणेश येईल, आणि आपले हृदय आपली बुध्दी ही रिकामीच असतील. गणपति पुन्हा यईल, एक वर्ष जाईल, परंतु आमची बुध्दी पोरकट व ज्ञानहीन असेल; देव येईल परंतु आमचे शरीर रोडके असेल, तसे होता कामा नये. पुढील वर्षी गणपती येईल त्यावेळी प्रत्येकाने नवीन ज्ञान देवापुढे मांडावे; नवीन सद्विचारांची फुले हृदयवेलीवर आलेली त्यास वहावी. आपले व्यायामाने व खेळाने घाटदार व छानदार झालेले, चपळ व पुष्ट असे शरीर देवास दाखवावे म्हणजे दरबर्षी मोरयास येण्यास आनंद वाटेल. ज्या प्रमाणे छात्रालयात राहण्याऱ्यांचे वडील जर येथे आले व त्यांनी आपल्या मुलांची प्रकृती सुधारलेली, बुध्दी तीक्ष्ण झालेली,विचार निर्मळ झालेले असे आढळले तर आनंद होईल, त्या प्रमाणेच या जगाच्या छात्रालयात या जगाच्या मोठ्या शाळेत आपणास गणपत्ती बाप्पाने ठेविले आहे. तो दरवर्षी आपली सुधारणा पाहण्यास येतो. माझ्या मुलांची कितपत सुधारणा झाली आहे, त्यांनी अमंगलत्व दूर केले आहे की नाही ते निस्तेज व कलाहीनच आहेत की काय हे पाहण्यास हा जगच्चालक, जगत्पिता दरवर्षी येतो. त्याला मुलांची सर्वांगीण सुधारणा दिसली तनमन सुसंस्कृत दिसले तर तो आनंदाने चार दिवस राहिल. तरच त्यास आनंद होईल. नाहीतर त्यास आपल्याबद्दल दया, प्रेम वाटणार नाही; आपल्याबद्दल त्यास औत्सुक्य वाटणार नाही. म्हणून हे एक वर्ष शरीर व मन, स्वत:चे दुसऱ्याचे धष्टपुष्ट व तेजस्वी करण्यात दक्ष.

* * *

# लोकमान्यांचे पुण्यस्मरण

तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हास घडो

गुरुवार ता. १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आहे. लोकमान्यांचे नाव माहीत नाही असा महाराष्ट्रीय विरळा. इंग्रजांचे राज्य महाराष्ट्रात चालू झाल्यावर महाराष्ट्रीय जनतेस पुनरपि जागी करणारे जे महापुरुष महाराष्ट्रात होऊन गेले त्यांतच बाळ गंगाधर टिळक यांचा अंतर्भाव आहे.

१८५६ मध्ये टिळकांचा जन्म झाला. लहानपणापासून ते फार हुशार व स्वाभिमानी होते. त्यांचे वडील शास्त्री होते. वडिलांजवळ लहानपणी ते संस्कृत बरेच शिकले होते. मराठी शिक्षण संपल्यानंतर त्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले. मॅट्रिक परीक्षा पास झाल्यावर ते डेक्कन कॉलेजात पुढील अभ्यासासाठी जाऊ लागले. कॉलेजातील पहिल्या वर्षी त्यांनी उत्कृष्टपणे शरीर कमावले. हजार हजार जोर बैठका ते काढीत; तास तास नदीचे पात्रात संगमावर पोहत राहात. अशा प्रकारे पुढील आयुष्यात लागणारे शरीरबळ त्यांनी संपादन केले.

येथे कॉलेजमध्ये असता आगरकर त्यांचे सहाध्यायी होते. या दोघांचे येथे वादविवाद व्हावयाचे. टिळक हे जुन्या चालीरीती, धर्म परंपरांची तरफदारी करीत. या संबंधी परस्परांचे पटले नाही, तरी एका गोष्टीत उभयता एकावाक्यता झाली. ती गोष्ट म्हणजे लोकांमध्ये शिक्षण प्रसार करणे. शिक्षणाशिवाय राष्ट्र पंगू आहे. ही गोष्ट उभय देशभक्तांस पटली. त्यांनी चिपळूणकर यांनी नुकतीच सुरु केलेली न्यू इंग्लिश स्कूलची संस्था भरभराटीस आणण्यास

तयारी केली. न्यू इंग्लिश स्कूलचे पुढे फर्ग्यूसन कॉलेज पण निघाले. टिळक व आगरकर कॉलेजमध्ये शिकवू लागले.

विष्णुशास्त्री यांनी निबंधमाला हे मासिक पुस्तक धर्मपरंपरांची त्याप्रमाणे केसरी व मराठा ही अनुक्रमे मराठी व इंग्रजी साप्ताहिके काढून जनमने तयार करण्याचे काम चालविले. चिपळूणकरांच्या मरणानंतर 'मराठा' टिळक चालवीत व आगरकर केसरीत लिहीत. या वेळेसच कोल्हापूरच्या महाराजांचा रेसिडेंट छळ करतो, वगैरे मजकूर छापून कोल्हापूरचा सर्व कारभार केसरीने चव्हाट्यावर मांडला कोल्हापूरकर महाराजास वेडा ठरवून त्यांचे हाल करण्यात येत. परंतु शेवटी टिळक व आगरकर यांचेवर अब्रु नुकसानीचा खटला करण्यात आला. व त्यांस शिक्षा झाली. टिळक व आगरकर तुरुंगात जवळजवळच राहत व त्यांस तेथे वादविवाद करावयास सापडत. शिक्षणाच्या कार्यात दडून त्यांचे मतभेद येऊ लागले. कैद झाल्यामुळे या दोघां थोर थोर पुरुषांबद्दल जास्तच पूज्यबुध्दी महाराष्ट्रीयांस वाटू लागली.

परंतु आता टिळक व आगरकर यांचे पटेना. केसरी पत्रात आपल्या इच्छेविरुध्द आपणास लिहिता येत नाही म्हणून आगरकर यांनी नवमत प्रसारक 'सुधारक' हे वर्तमानपत्र काढले. टिळक केसरीपत्र चालवू लागले. पुढे कॉलेजमध्येही ही भांडणे होऊ लागली. व टिळकांनी कॉलेजमधील आपल्या कामाचा राजीनामा दिला.

आता सर्वस्वी केसरीचे काम टिळक करू लागले. केसरीची गर्जना महाराष्ट्रात घुमू लागली. लोकांत स्वाभिमान उत्पन्न होऊ लागला. इंग्रजी राज्याची भूल लोकांस पडली होती. परंतु हे स्मशानशांती निर्माण करणारे सरकार जनतेस कसे निःसत्त्व करीत आहे हे त्यांनी लोकास दाखविले. लोकात सरकारबद्दल असंतोष त्यांनी निर्माण केला. असंतोषः धियो मूलम। असंतोष हेच वैभवाचे मूल आहे. आहे त्याच परिस्थितीत समाधान मानून किड्यामुंगीप्रमाणे राहणे यात पौरुष नाही. पुरुषार्थ नाही. उठा, संघटना करा स्वाभिमान धरा असे शिकवू लागले. शिवाजीउत्सव

त्यांनी सुरू केला व रायगडावर मोठ्या प्रमाणावर शिवाजी समारंभ त्यांनी घडवून आणला.आजूबाजूचे शेकडो मावळे मराठे या उत्सवास जमले व टिळक स्वत: पंक्तीतून वाढीत होते. गणपतीउत्सव पण त्यांनी सुरू केला. दहा दिवस गणपती उत्सव सुरु असतो. या प्रकारे संघटना, स्वाभिमान जेणे करुन निर्माण होईल त्या गोष्टी ते करु लागले.

१८८७ मध्ये केसरीतील लेखाबद्दल त्यांना पुन्हा शिक्षा झाली. यावेळेस तुरुंगात त्यांनी वेदासंबधी महत्त्वाचे पुस्तक लिहून काढले. टिळक हे मोठे पंडित व संशोधक होते. सर्व विषयात त्यांची गती सारखीच चाले. गणित शास्त्र ज्योतिषशास्त्र, संस्कृत वाङ्मय , तत्त्वज्ञान सर्व बाबतीत त्यांची बुध्दी अकुंठीत गतीने चाले. तुरुंगातून अशक्त होऊन मोकळे झाल्यावर पुन्हा केसरीचे संपादकत्व हाती घेऊन ''पुनश्च हरि ॐ''हा तेजस्वी लेख त्यांनी लिहिला. तेजस्वी माणसाचे तेज संकटांनीच प्रखरतर होते. तोडलेला तरू वठून न जाता आणखी भराने तरारतो. केसरी महाराष्टात प्रिय झाला. टिळकांचे नाव सर्व हिंदुस्थानात गर्जू लागले.

१९०५ - ६ च्या सुमारास बंगाल प्रांताची बंगाली लोकांची जूट तोड करण्यासाठी लॉर्ड कर्झन यांनी विभागणी केली. ही विभागणी बंगाली लोकांनी बंद पाडण्यासाठी जोराची चळवळ सुरू केली. अरविंद घोष, त्यांचे बंधु वारींद्र बिपीनचंद्र पाल, सुरेंद्रनाथ वगैरे पुढारी बंगालप्रांतात देशभक्ती प्रज्वलीत करु लागले. इकडे महाराष्ट्रात ही चळवळ सुरु झाली. यावेळेस केसरीत तेजाळ लेख लोकमान्यांनी लिहिले. पुन्हा त्यांच्यावर खटला भरण्यात आला. टिळकांनी ७ तास आपले भाषण चालविले होते . या भाषणात त्यांचे गांभीर्य, देशहिताची तळमळ, विव्दता, कायदेपटुता हे सर्व दिसून येते.आपणास शिक्षा होणार ही गोष्ट त्यास दिसतच होती व म्हणूनच आपली सर्व मते या भाषणात त्यांनी बोलून दाखविली. खटला बरेच दिवस चालून एक दिवस रात्री ९ वाजता निकाल सांगण्यात आला व टिळकांना ७ वर्षाची काळ्यापाण्याची शिक्षा फर्माविण्यात आली. मुख्य न्यायाधीश दावर हे पारशी

गृहस्थ होते. ते टिळकास म्हणाले, ''तुमचा मेंदू सडलेला आहे, म्हणून असे देशहितघातक तुम्ही लिहिता.'' शिक्षा दिल्यावर टिळक म्हणाले ''या न्यायासनापेक्षा थोर असे ईश्वरी न्यायासन आहेच. मी निरपराधी आहे. अशी माझी अद्यापही श्रध्दा आहे. कदाचित माझ्या हालअपेष्टामुळेच मी हाती घेतलेले कार्य जास्त यशस्वी होईल, ईश्वराची तशी इच्छा असेल'' या धीरोदात्त व शांत उद्गारांवरून टिळकांचे अलोट धैर्य आपणास दिसून येईल.

उतारवयात ७ वर्षाची शिक्षा, यामुळे सर्व देश हळहळला. टिळक हे योगी होते. त्यांच्या मनाची समता कधी ढळत नसे. पर्वतावर मुसळधार पाऊस पडला तरी पर्वतास धक्का बसत नाही. तसेच थोर पुरुषांचे असते. स्वत:च्या संकटांची त्यास क्षिती नसते. या वेळेसही तुरुंगात टिळकांनी लोकोत्तर पुस्तक लिहिले. या पुस्तकाचे नाव 'गीतारहस्य' ८०० पानांचा हा मोठाग्रंथ आहे. यात टिळकांचे तत्त्वज्ञान आहे. हिंदूधर्म, हिंदु तत्त्वज्ञान कसे श्रेष्ठ आहे. हे त्यांनी सिध्द केले आहे. मनुष्याने सतत परहितार्थ कर्म करीत राहिले पाहिजे; उद्योग ध्येय समोर ठेवून करावा. यश मिळो वा न मिळो. सिध्दी देणे हे परमेश्वराधीन आहे. प्रयत्न हा मानवाधीन आहे. या ग्रंथावरुन टिळकांची विव्दत्ता सहज दिसून येते. Arctic Home in the Vedas, orion हे दोन वेदांवरचे ग्रंथ व तिसरा गीतारहस्य असे. हे तीन ग्रंथ टिळकांच्या विव्दत्तेचे व पांडित्याचे निदर्शक आहेत. टिळक कैदेत असता त्यांची सुशील भार्या इकडे मरण पावली. त्यामुळे टिळकांना फार वाईट वाटले. ते तिकडून पाठविलेल्या एका पत्रात लिहितात, ''परमेश्वराने पाठविलेली दु:खे मी निमूटपणे सोशीत असतो खरा,परंतु ही वार्ता वाचून माझे मनही हादरले'' तुरुंगातून सुटून आल्यावर पुन्हा शरीरप्रकृती सुधारताच त्यांनी राष्ट्र कामगिरी खांद्यावर घेतली.

* * *

# ( १२ )

# स्वदेशी हा धर्म

स्वदेशी हा प्रत्येकाचा धर्म आहे. परदेशात कपड्यासाठी कोट्यावधी रुपये आपण दवडतो. आपले मजूर उपाशी मरतात. अशा वेळी खादी पेहरणे हे प्रत्येक सुशिक्षिताचे तरी कर्तव्य नाही का? व्याख्यात्यांनी आम्हा शिक्षकास उद्देशून सांगितले ''तुम्ही पूर्ण स्वदेशी बनून सर्व विद्यार्थ्यास स्वदेशीच धडे दिले पाहिजेत. सर्व भावी नागरिक तुम्ही तयार करणार'' स्वामीजींनी सांगितले परंतु महात्माजींचे शब्दाप्रमाणे वागण्यासही जेथे जनता तयार नाही तेथे लुंग्यासुंग्या शिक्षकाने समजा सांगितले तर त्याप्रमाणे कोण वागणार? शिक्षकावर सर्वजण जबाबदारी टाकतात परंतु शिक्षकाचे ऐकते कोण? मी या दैनिकातून खादीबद्दल शंभरवेळा लिहिले असेल परंतु छात्रालयात पवार व शंकर वाणी दोघे सोडले तर एक तरी विद्यार्थी खादी वापरतो का? मला समजत नाही की ही मुले शिक्षक सांगतात, पुढारी सांगतात, महात्मे सांगतातच तरी एवढी साधी गोष्ट का करीत नाहीत. इतकी का निगरगट्ट यांची मने झाली आहेत? मी मुंबईस मागे गेलो होतो. तेव्हा मला एकजण म्हणाला, ''कारे तू म्हणे अमळनेरच्या बोर्डिंगात सर्वास खादीभक्त बनविले आहे? त्याचे शब्द ऐकून मी खाली मान घातली. मी म्हटले ''अरे सांगणे आपले काम; करणे हे मुलांचे काम; त्यांना मारुन मुटकून काही स्वदेशी वापरा असे सांगता येत नाही. आम्ही हतबल आहोत. आमच्यात ते तेज नाही. आमची योग्यताच नाही की आमच्या शब्दाप्रमाणे मुलांनी वागावे.''

माझे मामा येथे आले होते व ते दापोलीच्या बोर्डिंगात राहत होते. दापोलीचे बोर्डिंग त्यावेळेस सर्व मुंबई इलाख्यात गाजले होते. दापोली हा रत्नागिरी जिल्ह्यातील एक तालुका

आहे, पहिले शाळेचे बोर्डिंग या इलाक्यात तेच मग न्यू. इ. स्कूल वगैरेंची बोर्डिंगे निघाली. या बोर्डिंगात १५०-२०० मुले होती. तेथील व्यवस्थापक नारायणराव गोगटे म्हणून होते. हे फार तेजस्वी पुरुष होते. गोगटे हे तेथील मिशन स्कूलमध्ये मास्तर होते. या गोगट्यांच्या मनात शेकडो कल्पना असत. दापोलीत ५० एकर जमिनीत आरारोट लावून द. अफ्रिकेत बोअरवॉटरच्या वेळेस ते १० हजार पौंड आरारोट शिपायांस पाठवित. असे धाडसी उद्योग होते. मिशनस्कूलमधील एका पाद्री व्यवस्थापकाने मोडी पुस्तीत वरती 'श्री' लिहू नये. असे फर्माविले. ज्या दिवशी अशी नोटीस निघाली त्या दिवशी गोगटे शाळेत आले नव्हते.त्यांना ही गोष्ट सायंकाळी समजली. ते फिरावयास जात होते. वाटेत हे पाद्री अधिकारी भेटले तेव्हा नारायणराव संतापले व त्या साहेबास जोडा काढून मारावयास निघाले.''उद्या आपला हुकूम मागे घे; नाहीतर मी जोड्याने मारीन, याद राख'' असे सांगून ते गेले. असे स्वतंत्र बाण्याचे ते होते या बोर्डिंगात पुष्कळ शिक्षक राहत. तेथेही साने मास्तर म्हणून एक होते. त्यांचे माझे नाते नव्हते परंतु माझी आजीसुध्दा या सानेमास्तरांच्या गोष्टी सांगे. इतके ते लोकप्रिय झाले होते. हे साने मास्तर सर्व मुलांस स्वदेशी वापरण्याबद्दल निक्षून सांगत. ते स्वत: कपड्यांची ठाणे मागवित व एक शिंपी ठरलेला असे, त्याच्या कडून सर्व कपडे शिववून घेत. माझा मामा मला म्हणाला, ''साने मास्तरांच्या सांगण्याविरुध्द कोणी जात नसे. आम्ही सर्व ते शिवून देतील ते कपडे वापरीत असू'' मामास मी म्हटले ''तुमचे साने मास्तर थोर पुण्याईचे, म्हणून त्यांचे मुले ऐकत; परंतु येथे मी सांगतो पण कोणीच ऐकत नाही.'' माझ्या मामास हे ऐकून आश्चर्य वाटले.

--

मुलांनो, आम्ही सांगितलेले एक काम तुम्ही आनंदाने करिता; त्यावेळेस किती आज्ञाधारकपणे तुम्ही वागता? पण हाच आज्ञाधारकपणा या गोष्टीत का तुम्ही वापरू नये? महात्माजींची आज्ञा ऐकण्यास तुम्ही तयार नाही? ते किती थोर किती जगव्दंद्य किती देशासाठी रात्रंदिवस तळमळतात; त्या महात्म्यास किती आनंद होईल जर त्यास मला कळविता आले की आमची शाळा

व बोर्डिंग यातील मुले खादी वापरतात! अशा प्रकारच्या महात्माजीस आनंद सर्व शाळातील विद्यार्थ्यांनी दिला तर त्यांचे आयुष्य वाढेल, उत्साह वाढेल; तरुण लोक काही तरी करतील असे त्यास वाटेल परंतु या दुर्दैवी देशाची अशीच स्थिती आहे की काही पुढाऱ्यांनी मरमर मरावे; आपली मोलवान आयुष्ये समाजाच्या उन्नत्यर्थ खर्चावी, रक्ताने पाणी करावे, त्यांनी जिवाचे रान करावे. एकेक दिवसात सातआठ ठिकाणी व्याख्याने द्यावी, दौरे काढावे; क्षणभर विश्रांती न घेता हाडाची काडे करावी; शरीर खिळखिळे करावे. पण या सर्वाबद्दल हे निगरगट्ट स्वाभिमानशून्य स्वदेशप्रेम शून्य, सुखविलासी, ऐदी लोक काही तरी मोबदला देतात का? परमेश्वरा, केव्हा आमच्या मनात तू थोडी तरी जागृती, थोडी तरी देशप्रेमाची ज्योति उत्पन्न करशील, अंतरीचा हा दिवा तू केव्हा लावणार आहेस. आज आम्हा सर्वांची अंत:करणे स्वार्थाच्या अंध:काराने, सुखवासनांच्या तिमिराने, विलासांच्या तमाने भरुन गेली आहेत. देश प्रेमाचा पवित्र नंदादीप तू तेथे कधी बरे लावशील? त्या दीपाच्या प्रकाशांत आमची चुकणारी पाऊले केव्हा बरे आम्ही सुधारु? भगवंता, तुलाच माहीत!

*       *       *

3009
वा.वा.

# ‘पत्री’ च्या निमित्ताने

प्रत्येकाला वाटते ते त्याने मांडावे. जुन्याचेच तुणतुणे वाजवीत बसू नये. ध्येयमूर्ती जवाहरलाल म्हणतात, “Think dangerously and act dangerou-sly . उत्कट आचार व उत्कट विचार पाहिजे. नवीन विचार मांडले पाहिजेत, नवीन आचार दाखविले पाहिजेत. आचार हा विचारपूर्वक झाला पाहिजे. शास्त्र हे सदैव वाढतच आहे. कोणतेही शास्त्र पूर्णावस्थेस गेले नाही. सगळी शास्त्रे वाढती आहेत. जगातील विचार घेतले पाहिजेत. नम्रपणे संशोधन, चिंतन, मनन केले पाहिजे. फक्त एकाच गोष्टीची जरुर आहे. ‘‘मी जे सांगत आहे, त्याने समाजाचे खरे कल्याणच होईल.’’ ही हृदयात पूर्णश्रध्दा असली म्हणजे झाले. जे सांगतो त्याप्रमाणे करावयास जे विचार मांडतो त्यांना मिठी मारावयास आपण तहानलेले असलो म्हणजे झाले. जो स्वत:ला फसवीत नाही, तो जगाला फसविणार नाही. जरी त्याने चुकीचे सांगितले असले तरी ते

प्रामाणिकपणे सांगितले असल्यामुळे त्याला दोष नाही. अशा विचारसरणीचा मी मनुष्य आहे.

तेजस्वी व सुंदर विचार भारतात प्रकट होवोत; तेजस्वी आचार करावयास सारे तयार होवोत. अशा रीतीनेच आपण

"होऊ प्रभुचे यात्रेकरु
जग हे आनंदाने भरु"

ही मानवीयात्रा कोठे तरी मंगलाकडे आस्ते आस्ते चालली आहे. कधी गंभीर तर कधी उथळ, कधी सरळ तर कधी वक्र, अशा रीतीने हा प्रवाह सतत पुढे जात आहे. एक दिवस अनंत सौंदर्य सागरास, कल्याणसागरास हा प्रवाह मिळणार आहे. हे मानवीसमाजाचे फार दूरचे ध्येय न विसरता आपण आपापली पाऊले शक्य तो टाकू या.

कदाचित भारताचे हेच काम असेल! जगाचा शांतिगुरु शेवटी तो होणार असेल! अनंत त्याग करुन भारताने आधी मुक्त व्हावे व जगाला वर उचलावे.

"संहारुनि संसारविषमता
असुर-समरतता सत्ता-सरता-
शांति पथा दावो।। प्रियकर भारत।।
करुनि निजांतर तिमिरनिरास
करुन घेऊ दे जगा विकास।।
यांचे हे महान कार्य आहे.
प्रतिबंध न राहो।।
याची विस्मृती मजला न होवो।। प्रियकर भारत।।

कवि संत माझे हृदय, माझी धडपड, माझ्या आशानिराशा माझी स्वप्ने. या कविता म्हणजे माझी वाङ्मयीन मूर्ती आहे. महान कवितेतील व्हिटमन यांचे शब्द मी लघु कवीने घेऊन जर म्हटले.

"Who touches this book, touches the man.

जो हात ह्या लाविल पुस्तकास

ते अतिशयोक्तीचे होईल अयथार्थ होईल. असे मला वाटत नाही. म्हणून इतर प्रसिध्द करण्यापूर्वी या पत्राव्दारा माझे भलेबुरे अंतरंग, माझे बरे वाईट जीवन भाषा माऊलीच्या चरणी अर्पण करीत आहे.

मी अगदी बाळपणापासून कविहृदयाचा आहे. बाळपणापासून भक्त आहे. भक्ति व काव्यशक्ती ही लहानपणापासून जन्मत:च माझ्या बरोबर आली आहेत. लहानपणी पोथ्यापुराणातून जी आख्याने मी वाचीत असे ती साकी, दिंडी वगैरे वृत्तात रचून भावाला आंदळतांना मी म्हणत असे. मी मराठी चौथी पाचवीत तेव्हा होतो. मी नेणतपणे कवी त्यावेळी होतो. दापोलीच्या हायस्कूलमध्ये मी पाचवी यत्ता होईपर्यंत होतो. त्यावेळीच मी कवितांची बाडे भरली होती. Words from Poets यातील किती तरी कविता भाषांतरिल्या होत्या. मला शाळेत Boy poet असे म्हणत. मी घरी आईबापास म्हणे, ''माझ्या कविता छापू दे, म्हणजे तुमचे दारिद्र दूर होईल'' लिहिलेले छापण्यास किती कष्ट पडतात व अशा सात्त्विक कविता खपण्यास किती जड जाते याचा त्यावेळेस मला कोठून अनुभव असणार?

परंतु १९१६ मध्ये मी औंधला गेलो. माझ्या वह्या मी फाडल्या. हे कृत्रिम काव्य आहे असे मला वाटले. मोरोपंतासारखी यमके आणणे हाच माझा तेव्हा आनंद असे. सबंध चरणच्या चरण यमकमय मी रचित असे! परंतु हे सारे मी सोडले. १९१७ मध्ये पुण्यास आलो. १९१७ ते १९२३ पर्यंत मी पुण्यास होतो. न्यू पूना कॉलेजमध्ये कॉलेजचे शिक्षण झाले. मी त्या काळात फार लिहिले नाही. वाचले मात्र भरपूर. उत्कृष्ट मराठी वाङमय मी वाचून काढले. उत्कृष्ट इंग्रजी लेखक वाचले. माझे मन मी भरून ठेवीत होतो. व्हिटमन माझा आवडता कवी होता. Leaves of Grass 'तृणपर्णे' हे त्याने आपल्या कवितास नाव दिले होते. 'पत्री' हे नाव देताना तेच नाव माझ्या डोळ्यासमोर आहे. तृणपर्णात भारतीय पूजेची कल्पना मिसळली म्हणजे पत्री तयार होते!

१९२३ जूनमध्ये मी अमळनेरला आलो व अमळनेरचाच झालो. १९२४ / २५ मध्ये गटेच्या फौस्टचे मी भाषांतर करीत होतो. एक भारताच्या सद्य:स्थितीवर खंडकाव्यही लिहित होतो. परंतु पुढे मधुनमधून मी एखादेवेळेस लिहित असे. परंतु नामदार गोखले, देशबंधू दास वगैरेची चरित्रे लिहिण्यात मी दंग होतो. गोखले चरित्र प्रसिध्द झाले. देशबंधूंचे प्रचंड चरित्र पडूनच आहे.

परंतु एक भावनात्मक, धडपडणारा कविहृदयाचा मनुष्य मी आहे. मी ''जगुभाउ'' आहे. भाऊ आहे? जगू का मरू करीत हृदयाच्या ओलाव्यामुळे व हृदयातील प्रेमामुळे अजूनहि जिवंत काव्य समजावयास कवीची मनोभूमिका माहीत असणे बरे असते. काव्यातील गाभा पकडता यावा यासाठी कवीचा विशेषत: त्याच्या मनोवृत्तींचा थोडा फार रागरंग माहीत असला तर मदत होते. विशेषत: जे कवी Subjective आहेत. त्यांच्या बाबतीत तरी ह्याची जरुर असते असे मला वाटते. म्हणून मी माझी मनोभूमिका थोडीशी दाखवून देणार आहे. परंतु त्या मनोभूमीकडे वाचकास नेण्याआधी माझ्यामधील काव्यांकुराची कशी वाढ झाली ते ते आधी त्यांना सांगणार आहे. व नंतर माझ्या अंतरंगात त्यांना मी घेऊन जाणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यामध्ये मालगड गावी माझा जन्म झाला. बालवयातच श्रीधर व महीपती यांचे बहुतेक ग्रंथ मी अनेकवेळा वाचले होते. आमच्या घरी रोज रात्री पोथी वाचण्याचा नेम असे. मराठी तिसरी यत्तेपासून हे काम माझ्याकडेच होते. वडील व इतर मंडळी जवळ बसत. वडील संस्कृत शब्दांचा मधून अर्थ विचारावयाचे व सांगावयाचे. रामविजय वाचतांना मारुतीचा पाट मांडण्याची पध्दत असे. मला रामविजय वाचतांना एक प्रसंग आठवतो. रामविजयातील अध्याय मोठमोठे आहेत. रामविजयाचा अध्याय अर्धवट सोडावयाचा नाही, तो पुरा वाचला पाहिजे अशी परंपरा आहे. सीतेचा वनात त्याग करण्याचा तो प्रसंग होतो तो करुणरसपूर्ण अध्याय मला वाचवेना. मला रडू येऊ लागले मी उठलो व वडिलांनी पुरा केला. अश्याप्रकारे मी वाढत होतो. रामायण महाभारत यांची भाषांतरे वाचली. भागवत संस्कृतमध्ये वाचावयाचे व खालचा मराठी अर्थ वाचावयाचा असे करुन तेही

वाचले. मराठी पाचवी यत्ता होईपर्यंत माझे पुष्कळच वाचन झाले. कथांची माहिती झाली. शब्दांचा भरणा किती तरी वाढला. भक्तिविजयातील किती तरी धावे मी पाठ केले होते व अजून मला येत आहेत. भक्तिभाव माझ्या हृदयात कायमचा ठसला. राम दिसावा म्हणून रामविजय उशाला घेऊन मी श्रध्देने निजत असे. रामनामाचा जप मी रात्री करीत बसे. रोज पहाटे उठून बकुळीची फुले जमवून मी देवांना हार करीत असे. मी भक्त बनलो.

खोबरे हेचि क्षमा
फोडून व्दैताच्या बदामा
मनोजयाच्या वर्ख हेमा
कापुर हा शांतीनामा
विडा घ्या हो नारायणा

या सर्व वाङ्मयाचा मी श्रोता, भोक्ता व भक्त असल्यामुळे माझ्यावर त्यांचा खूपच परिणाम झालेला आहे. दासबोध, ज्ञानेश्वरी, गाथा हे जणु मी मिळून पीत होतो. मराठीतील फडक्यांचे हे तेजस्वी व हृदय उचंबळवणारे चरित्र होते. ते मी सहावी सातवीत असतांना रात्रंदिवस वाचीत असे. विवेकानंदांची भाषणे, रामकृष्णवाक्सुधा ही पुस्तके नेहमी वाचीत असे वर्गातील पुस्तके मी क्वचितच वाचीत असे.

१९१८ मध्ये मॅट्रीकच्या परीक्षेच्यावेळी माझा अभ्यास असा चालला होता. कॉलेजमध्ये मी गेलो. १९१८ ते २३ पर्यंत बायबल, कीटस्, शेली, ब्राउनिंग, इमर्सन, टेनीसन, वर्डस्वर्थ ही पुन्हापुन्हा वाचली. व्हिटमन तर माझा सर्वात आवडता कवी. त्याने आपल्या कवितांना दिलेले Leaves of Grass हे नावच मला उदात्त वाटले. १९१८ पासून हे नाव कानात गुणगुणत आहे. मी जर कधी काव्य लिहिले तर त्यास 'तृणपर्णे' असे नाव देईन असे मी त्यावेळेस मनात म्हणत असे. आज काव्यसंग्रहास ''पत्री'' हे मी जे नाव दिले आहे. त्याच्या मुळाशी ''तृणपर्णे'' हेच नाव आहे. अमेरिकेतील तृणपर्णात मी भारतीय संस्कृतीतील पूजेची भावना मिसळली आहे. तृणपर्णात भक्ती ओतली की

पत्री तयार होते.

कॉलेजमध्ये असतांना प्रो. लागू व प्रो. पोतदार यांचा माझ्यावर परिणाम झाला. प्रो. लागूंचा प्रत्येक शब्द उतरुन घ्यावा असे मला वाटे. लागूंची उत्कटता, त्यांचे अफाट वाचन ती ज्ञाननिष्ठा ही मला फार पूज्य वाटत. त्यांना पाहिले की माझे डोळे त्यांच्या पायांकडे जात. प्रो. पोतदार यांनी माझ्या वरचीच असलेली "देशभक्त किति ते मरती" ही कविता स्फूर्तिमूर्ति व त्यागमूर्ती भगतसिंग वगैरे फाशी देण्यात आले अशी खोटीच बातमी त्रिचनापली जेलमध्ये आम्हाला कळली, त्यावेळेस लिहिली. परंतु त्यावेळेस त्यांना फाशी देण्यात आले नव्हते. मी ज्यादिवशी सुटलो त्यादिवशी त्यांना फाशी देण्यात आले.

"प्रेम का करावे." ही कविता त्रिचनापल्लीस मनाच्या असहाय अवस्थेत मी लिहिली. मी तुरुंगात नवीन गेलेला. कष्टांना मी कंटाळत नसे. परंतु कोणाचे तरी पत्र यावे असे सदा वाटे. माझ्या आधी सुटून जाणारे स्नेही व मित्र "पत्रे पाठवू लांबपत्रे पाठवू" असे सांगत. परंतु कोणाचेही पत्र येत नसे. "मला कोण आहे, माझ्याजवळ काय आहे." असे अगतिकपणाचे विचार त्या दिवशी मनात आले. सायंकाळी दु:खाने फिरत असता ती फुले दिसली. जणु प्रेमाने बघणारे डोळे तो सारा प्रसंग मी वर्णिला आहे. खान्देशातील दोंडाईचे येथील श्रीयुत नानाशेठ शिंपी माझ्या शेजारी असत. त्यांना मी ती फुले नेऊन दाखविली व म्हटले "नानाशेठ भूमातेचे प्रेमपूर्ण हे डोळे! आहेत, नाही?" मी भावनांनी कापत होतो. अजून तो प्रसंग आठवताच मी सद्गदित होतो.

"आई तू मज मार मार" ही कविता धुळे जेलमध्ये एका विशिष्ट प्रसंगी लिहिली आहे. "हृदयंगम वाजत वेणु" व "दिव्याआनंद / मन्मना एक गोविंद" या कविता तुरुंगातील गोकुळ अष्टमीस लिहिलेल्या आहेत.पहिली नाशिकला व दुसरी त्रिचनापल्लीस.

"हे सुंदरा अनंता" या कवितेचा इतिहास फारच भावनामय आहे. नाशिकला प्रथम आम्हाला कडक वागवीत असत. आम्ही

कँपजेलमध्ये होतो सायंकाळी फारच उत्कृष्ट देखावे दिसत. परंतु आम्हाला पहाता येत नसत. शेवटी लघवी किंवा शौचाचे निमित्त करुन मी जात असे! संडासाजवळ उभे राहून,लघवीच्या कुंड्याजवळ उभे राहून त्या आकाशांतील अमृतसागरात मी पोहावयास व डुंबण्यास जात असे. इतक्यात शिपायी किंवा वार्डर जवळच्या कुंड्याची व दड्याची आठवण देई. तंबूत परत यावे लागे. त्यावेळेस

"किती पाहु पाहु पाहू। तृप्ति न रे बघून
शतभावनांनि हृदय। येई उचंबळून"

हे चरण एकदम तोंडातून बाहेर पडले! पुढे कविता झाली.

धुळे जेलमध्ये १९३४ मध्ये असतांना कोकिळा सारखी उत्कटतेने कुऊकुऊ करी. झाडांना देवाने नवीन वस्त्रे दिली. आमचे कपडे फाटले होते. अर्ज करुनही मिळत नसत परंतु त्या मुक्या झाडांना देवाने नटवले. लहानापासून थोरांना हिरवे पोषाख दिले. कोकिळा प्रेमाने गाऊ लागली. परंतु माझ्या हृदयात वसंत कोठे होता? त्या विरोधाचे वर्णन त्या कवितेत आहे.

"त्वत्स्पर्श अमृताचा। मजला मृता मिळू दे।
मम रोमरोमि रामा। चैतन्य संचरु दे।"

हा चरण गोड चरण मी मनात गुणगुणू लागलो. तो चरण माझा मलाच फार आवडला. मी तो चरण साऱ्यांना म्हणून दाखवीत होतो. शेवटी संपूर्ण कविता तयार झाली.

असे अनेक मनोरम प्रसंग या कवितांच्या प्रसूतीच्या मुळाशी आहेत. ते सारे येथे सांगणे बरे नव्हे.

या संग्रहात देव व देश या दोनच मूर्ति सर्वत्र आढळतील. स्वत:च्या आशानिराशाही दिसतील. स्वत:ची उन्नति, सेवेची इच्छा या संबंधीच्या या आशानिराशा आहेत. माझे काम काय, मी कशासाठी जन्मलो, माझ्या हातून काय होईल, काय झाले पाहिजे. हे अनेक प्रश्न हृदयात काहूर उडवतात व ते ह्या संग्रहात दिसतील. या कवितात निराशा असली तरी ती आशावंत निराशा आहे. काहीतरी हातून व्हावे भले व्हावे, देशसेवा व्हावी याची

तळमळ येथे आहे. ती विश्वमाता व तिचीच मूर्त प्रतिमा म्हणजे ही भारतमाता या पवित्र सर्वत्र मातेचा महिमा आहे. जन्मदायी माता, भूमाता, जगन्माता, यांचे पवित्र पूजन व वर्णन या पत्रीत आहे. कधीकधी मातृभक्त या नावानेच मी विद्यार्थी मासिकात कविता देत असे. मातांना मी आळविले आहे.

माझ्या जीवनातील भक्ति दूर करणे म्हणजे मी मढेच होऊन पडणे होय. देवासाठी म्हणजेच मी चांगले व्हावे यासाठी सदैव रडणे हा माझा धर्मच बनून गेला आहे. निर्मळ व निर्वासन झाल्याशिवाय जगावर खरे प्रेम मी करु शकणार नाही; जगाची खरी सेवा मी करु शकणार नाही. माझे हृदय अनेक आसक्ति व वासना यांनी बरबटलेले पाहिले म्हणजे मला रडू येते. मी चांगले होण्यासाठी जितका रडलो आहे., तितका कशासाठी नाही. देवाची माझ्यावर कृपाच नाही. असे कधी मला वाटे. त्याची कृपा असती तर मी असा राहतो ना. स्वत:चे जीवन धुतल्या तांदळासारखे होत नाही. म्हणून मी निराश होतो, भ्रमिष्ट होतो. माझ्या मित्रांना हा माझा अनुभव आहे.

बाल्यापासून
हृदयात बसून
गोष्टी सांगे गोड
पुरवि माझे कोड
कोठे गेला आजी सोडून माझे धाम
कोठे गेला माझा मनोमंदिर राम

वगैरे प्रश्न निराश होऊन मी स्वत:ला विचारीत राहतो. लहानपणी हृदयात होता. आज नाही म्हणून तर हृदयाचा कबजा कामक्रोधांनी घेतला. हा विचार मनात येऊन त्याला मी ये ये म्हणत बसतो.

परंतु हृदय शुध्द झाल्याशिवाय तो येणार नाही. तो आल्याशिवाय हृदय शुध्द होणार नाही. ही घरातील शतजन्माची घाण दूर करावयास मी असमर्थ आहे. घाण दूर झाल्याशिवाय तो मिळणे कठीण! असा हा बिकट प्रश्न आहे. म्हणून मला शेवटी निराशा प्राप्त होते. मला कशात आनंद वाटत नाही.

घुबडासारखे अंधारात बसावे असेच वाटते. सृष्टीतील संगीत आनंद मी उपभोगू शकत नाही.

सृष्टित ये वसंत। परि मन्मनी शिशीर
अशी माझी स्थिती होते.

वसंत येई पिक गोड गाई। वनस्थली रम्य सजून राही
फुलांफळांना प्रभु ये बहार। मदीय नेत्री परि अश्रुधार
शरद ॠतू ये सुखद प्रसन्न। धरा सधान्या सरिता प्रसन्न
प्रसन्न आकाश प्रसन्न तारे। मदीय नेत्री परि अश्रु बा रे

असे माझे दृश्य आहे. सृष्टि मला म्हणते ''हस रे माझ्या मुला'' परंतु माझे मन मला म्हणते ''रडे रडे संतत तू रडे रे। न जोवरी त्वत्तनु पडे रे.''

अशा निराशेच्या भ्रमात मला असे वाटू लागते की जगात कोणीच चांगले नाही. मी चांगला नाही, तेव्हा जग तरी कसे चांगले असेल? असा बुध्दिवाद मी करितो, जगातील थोर व्यक्तिंचे दोषच मी पाहू लागतो. मोठमोठ्या महात्म्यांच्या जीवनांचा विकृत अर्थ करु लागतो. ''रामकृष्ण परमहंस विवेकानंदाना पाहण्यासाठी अधीर होत, म्हणजे ते आसक्तच नव्हते का'' असे मी वेडा माझ्या आसक्तीच्या चिखलातून बडबडू लागे! अशी बडबड मग पुन्हा अश्रुलोट वाहत!

निराश होतो बनतो भ्रमिष्ट। विनिंदितो व्यक्ति जगद् गरिष्ठ

असे मी जे वर्णिले आहे तो स्वानुभव आहे.

महात्माजींसारख्याचे सेवामय, त्यागमय, प्रेममय जीवन पाहिले व स्वतःचे निस्सार जीवन पाहिले म्हणजे मला भडभडून येते.

ओसाड जीवनाचे। पाहून वाळवंट
करपून जीव जाई। येई भरुन कंठ
ओसाड जीवनाची। भूमी सदा बघून
वणवेच पेटतात। मनि, जात मी जळून

वगैरे जे वर्णन केले आहे. ते काहीच नाही. हृदयाची

स्थिति शब्द वर्णू शकणार नाहीत.

पावित्र्य हा जीवनाचा पहिला कायदा. रामतीर्थ म्हणत "Purity is the first law of life"पावित्र्य म्हणजे चिरयज्ञ Purity is constant sacrifice असे ॲमिलने म्हटले आहे. त्रिसुपर्णातील हा ''मन्यु: पशु:'' याचे सारखे हवन करीत राहिले पाहिजे. आपले दोष जाळीत राहणे, दूर करीत राहणे, असा हा विकारपशूंचा होम करीत राहणे म्हणजे पावित्राचा पंथ या पावित्र्यासाठी मी धडपडत आहे.

तारे पाहिले, फुले पाहिली म्हणजे माझे डोळे भरून येतात. ताऱ्यांना पाहताच

''केव्हा होइल जीवन माझे पवित्र ताऱ्यापरी
हुरहुर एक हीच अंतरी।''

असे मी बोलतो! फुलांना पाहून मी मान खाली घालून उभा राहतो. फूल म्हणजे भगवंताची पवित्र मूर्ति असे मला वाटत असते. तारे, फुले, वृक्ष, नद्या,पर्वत, समुद्र, आकाश या भगवंताच्या विश्वमंदिरातील थोर मूर्ति आहेत. परंतु फुलाची मूर्ती फारच मधूर फारच गोड! त्या फुलाला हात लावावयास मी तयार नाही. निर्दोष, निर्मळ फुलाला माझे मलीन पत्रीमन समजत नाही. मी परमेश्वराजवळ केवळ निर्मळ हृदयाची मागणी करतो.

एक मागणे तुजला मागे
''एक मागणे तुजला मागे
दे निर्मळ हृदयास''
''मदीय मालिन्य धुवावयाते
झ्याणे कोण समर्थ माते''

वगैरे शेकडो ठिकाणी हेच सांगणे आहे. माझ्या अश्रूंनी मी माझे अंतरंग धुवून टाकीतच आहे. परंतु ह्या अश्रुधारा तोकड्या पडतील. अनंत जन्माची घाण जाणार कशी?

''कामक्रोधाच्या वटवाघळानी
नाना वासनांच्या उंदीरघुशीनी

घाण ठेवली करुन
धुवायाला मेघधारा
आल्या भरभरुन''

परंतु ह्या मेघधारा पुरे पडतील का? होय. अश्रूत ते सामर्थ्य आहे. तो लहानसा अश्रू त्यात हे सामर्थ्य आहे.

इवलासा अश्रु पर्वत बुडवी
जीवास चढवी मोक्षपदी

पापाने पर्वत बुडवण्याचे सामर्थ्य एका अनुतापबिंदूत आहे. तो 'खारट आंबट अश्रू अवीट सुधासिंधू आणून देतो.'' हे अश्रू मजजवळ आहेत. म्हणून मला आशा आहे. पाप करण्यात प्रौढी वाटत नाही. हे काय थोडे आहे.

'अजून पाप करण्यातचि ना वाटते कृतार्थ कृतार्थ
पाप पहिल्यावरि तरि ते नयन आर्द्र होत'

एवढी धगधगी आहे, म्हणून तर मी जगत आहे. ह्या अश्रुंच्या ओलाव्यामुळे माझे जीवन मला सह्य झाले आहे. One who can never see God" न नीर ज्याच्या कधि लोचनाला'' हा जर्मन कवि गटेचा चरण मला धीर देतो. He is not worth living who has not even once thought committing suicide in his life"

''नको हे जीवन असय्य होई
करू दे लवलाही याचा नाश
कधीही न ऐसे मनी जो बोलला
लायकी न त्याला जगायाची''

हा एका फ्रेंच तत्वज्ञानी पुरुषाचा विचार ''तू जगावयास लायक आहेस असे मला सांगत आहे. Even if you condemn yourself, God will not condemn you

जरी स्वत:ला अवमानिशील
न देव धिक्कार तुझा करील''

हे ऑमिल या थोर ग्रंथकाराचे उद्‌गार मला आशा

देत आहेत. भक्तिप्रेमाने नाचणारी मिराबाई म्हणते.

''असुवनजल सिंच सिंच भक्तिवेल बोई''

माझ्या अश्रुंच्या जलाने मी भक्तिवेल वाढवली आहे. मीही माझ्या मनाला सांगत आहे की

रडू तू अखंड बाळा। भरू दे तुडूंब हृदय
येईल भक्ति मग ती। होईल सच्चिद्रुदय
हे भाग्यवंत अश्रु। जवळी तुझ्या विपुल
हसशील लौकरीच। जरि आज तू मलूल''

आशानिराशांच्या अशा लाटांवर मीच
खालीवर होई तुझा देवा दास दीन
असे मी स्वस्थितीचे वर्णन केले आहे.

कधी कधी मन अती प्रसन्न असते. पवित्र व निष्पाप आहे असे वाटते. त्यावेळेस हृदयात किती आनंद असतो! असे क्षण मधूनमधून येतात. हृदयाकाश निरभ्र व स्वच्छ आहे असा भास होतो व वाटते, की तो गेलेला आला!

अति आनंद हृदयि भरला
प्रियकर प्रभु मम हृदयी आला

असे जीव गाऊ लागतो. आता तो जाणार नाही. मला रडवणार नाही अशी आशा मनात धरतो.

रहावया येतसे निरंतर
गोड मुकुंद

तो कायमचा रहावयास येणार आहे. मी साऱ्यांना जणु ही आनंदाची वार्ता देऊ लागतो.

प्रभु मम हृदयि आज येणार
परमैक्याच्या झोल्यावरती प्रभुसह मी झुलणार
प्रेमसमाधी लागुन माझी परममुदे डुलणार ॥ प्र.॥
जीवात्म्यांचे शतजन्माचे ग्रहण आज सुटणार
चिदंबरी मज उंच उडाया पंख दिव्य फुटणार ॥प्र.॥

असे मी आनंदनिर्भर होऊन सांगत सुटतो.

परंतु हे मंगल क्षण टिकत नाहीत. सद्विचार निघून जातात. प्रकाश जातोच. गडद अंधार व्यापून राहतो. आपण क्षणभर उंच गेलो. परंतु दृष्टि खाली मासखंडावरच अनुभवायास येते व रडू येते.

मी एका मासिकात एक गुलाबावर कविता दिली होती.

''वरितो परि कटकासन
न तपस्या तरि ना विकास''

त्या कवितेत होते. हेच विचार प्रस्तुत संग्रहातील फुलाची आत्मकथा या कवितेत आले आहेत. निर्झरावर एक कविता दिल्याचे स्मरते. ''निर्झरावरील'' कवितेत वारा पाण्याला प्रेमाने स्पर्श करावयास येतो. व अनंत भावनातरंग पाण्यावर उठतात. असा एक सुंदर भाव मी प्रकट केला होता. असे आठवते. परतु एकंदरीत मध्ये मी काही लिहिले नाही.

१९२३ पासून अमळनेरकरांशी माझा संबंध आला. त्यावेळेपासून संबंध आला तो कायमचाच जडल्यासारखा झाला आहे. मी या वेळेस खूप वाचले. गटेचे फौस्ट मी अनेकदा वाचले. त्यातील काही भागांचे मी भाषांतरही केले होते. परंतु पुढे भाषांतर करणे मी सोडले. मोलियर सुध्दा मी वाचून काढला. टॉलस्टाय वाचू लागलो. रवींद्रनाथ तर कॉलेजमध्ये असतांनाच मी अनेकदा वाचले होते. माझ्या घरी आजीला गीतांजली वाचून दाखवीत असे. तिलाही ती आवडत असे. १९२५ मध्ये मी एका खंडकाव्यात लिहिण्यास मी आरंभ केला होता. परंतु ते तसेच सोडले. त्या खंडकाव्यात हिंदुस्थानचे सद्य:कालीन वर्णन येणार होते. पंजाबमधील थोर कवि इक्बाल यांचेही काव्य मी या वेळेस वाचले. अशाप्रकारे मन करुन ठेवीत होतो. मधमाशीसारखा साठा करीत होतो.

अमळनेरला असतांना रात्री पाऊस पडत असतांना मी एकटाच पावसातून भिजत जात असे. विजांचा चमचमाट, मेघांचा गडगडाट, मुसळधार पाउस त्या दिव्य नाचात मी नाचत असे.

जणु मी भूतपिशाचच! शाळेत शिकवीत असतांना जर पाऊस पडू लागला तर मी पुस्तक मिटीत राही व पावसाकडे बघत असे. काळ्या ढगातून येण्याऱ्या त्या धारा पाहून माझे हृदय भरून येई. मी मुलांना म्हणे ''जा जरा व्हरांड्यात पाऊस पहा. मनुस्मृतीत पाऊस आला तर सुटी द्या असे आहे, परंतु आपले नशिब कोठे! दापोलीच्या शाळेत असतांना मात्र फार पाऊस जोराने आला तर पत्र्यांवर आवाज येईल शिकवलेले ऐकू येत नसे म्हणून आम्हाला सुटी देत. मनूचा धर्म पाळला जाई वगैरे मी मुलास सांगे. त्या हायस्कूलात चंद्रोदय भट्टाचार्य म्हणून एक थोर शिक्षक आहेत. अमळनेरच्या तत्त्वज्ञानमंदिरात ते आले होते. पुढे अमळनेरच्या शाळेने हे मोती उचलले. ते माझे जिवाचे स्नेही. नाना बंगाली ते मला मला गीते म्हणून दाखवीत. देशबंधू दासांचे एक प्रचंड चरित्र या १९२५ मध्ये लिहिलेले मजजवळ तसेच पडून आहे. ते लिहित असतांना देशबंधूंच्या साऱ्या कविता मी त्यांच्या बरोबर वाचल्या अनेक बंगाली भक्तिमय पद्ये, रवींद्रनाथाची गीते, वंगभंगाच्या चळवळीतील देशभक्तिपर गाने, व्दिजेद्रनांथाची पद्ये म्हणून दाखवीत. बंगाली सूर मला आवडत. चद्रोदयांनी माझ्या बुध्दिला खाद्य पुरविले आहे.

सायंकाळी आकाशातील देखावे पाहून मी त्यांच्याकडे पहात बसे.तसे मित्र अमळनेरचे श्री. गोखले हे एखादे वेळेस माझी थट्टाही करीत. मी माझ्या खोलीत असलो व तिकडे आकाशातील जर रंग भरु लागले असले तर ते एखाद्या छात्रालयातील मुलाबरोबर माझ्याकडे निरोप पाठवीत, ''अहो तिकडे तुमचे सौंदर्य पडले आहे ना! ते बघा.'' गोखले म्हणायचे ''लॅबोरेटरीत माझे सौदर्य आहे मला दुसरे सौंदर्य समजत नाही!''

जगात प्रेम आहे की नाही, जगात काही चांगले आहे की नाही त्याबद्दल त्यांचे व माझे खटके उडावयाचे. गोखले म्हणावयाचे ''जगात प्रेम बीम काही नाही सारा स्वार्थ आहे. आईचे प्रेम हे सुध्दा खोटे. प्रेम जगात असते तर प्रेमवस्तू दूर होताच मनुष्य मरता. पाणी दूर होताच मासा मरतो. हवा न मिळताच माणूस गुदमरतो त्याप्रमाणे प्रियवस्तूचा लोप होताच मनष्य मरुन पडला पाहिजे. परंतु असे जगात क्वचितच दिसते.

जग म्हणजे स्वार्थ व दंभ, रडणे वगैरे झूट आहे. मी तुम्हाला वाटेल तेव्हा प्रेम दाखवीन. अर्धा शेर का पाउणशेर सांगा. प्रेम अश्रू कृतज्ञता वगैरे हृदयातील भावना अशा प्रकारे दुखवल्या जाता या समयी निराश होत असे. परंतु माझ्या या भावना अखेर विजयी झाल्या व आज वाढलेल्या वयात

अनंत सागरात मिळाला फलक
अपार अंधारात दिसावी झलक
तान्हेल्याला लाभावी पाण्याची चुळूक
घामाघूम झालेल्याला वाऱ्याची झुळूक
असे मला होते.

परमेश्वराच्या भक्तीने या रडण्याने मी निर्मळ व्हावयाचे. निर्मळ कशासाठी? सेवा करण्यासाठी. मी निर्मळ नसेन तर जे मी करीन ते निर्मळ नसणार. अंतरीचे बाहेर धावणार. जशी भूमी तसा अंकुर. माझ्या जीवनाची भक्ती मी शुध्द केली, म्हणजे सेवेचे सुंदर अंकुर येतील. केवळ आईचे नाव घेत बसावे असे नाही मला वाटत. मनात आईचे नाव घ्यावे व हातांनी आईचे नाव घ्यावे व हातांनी आईचे चार धंदे करावे तिला मदत करावी असे वाटते. नाही करता आली तर नाही. A thousands run at his command परंतु माझ्याही लहान हातानं काहीतरी अल्पस्वल्प भले व्हावे असे वाटते.

''करावया मूर्त शुभ स्वहेतु। करी मला साधन आपुले तूं॥

असे माझे मागणे तर आहे. परमेश्वराची कर्ममय पूजा हातून व्हावी अशी मला असोशी आहे. परंतु ती कर्मे पदपूजाकांमी येण्यासारखी असावीत. ती किडीने खाल्लेली नसावीत, वासनांनी हुंगलेली नसावीत. जे कांही कर्म करायचे त्यात हृदयाचा सारा जिव्हाळा ओतून करावे असे मला वाटते आहे.

''मदंतरीची मिसळून भक्ती
मदीय कर्मी मिळवीन मुक्ती

किंवा

''पवित्र तारापरि दीप्तिमंत

मनोज्ञ पुष्पांसम गंधवंत
सुरम्य मी त्यापरि पाणिदार
कधी अर्पिन कर्महार''

१९३१ च्या मार्च महिन्याच्या अखेर मी सुटलो. खान्देशात अनेक कामे करण्यात गेला. बाळवृध्दांचा संवाद व इतर काही गीते ह्या काळांत मी लिहिली परंतु फार लिहिले नाही.

१९३२ च्या आरंभी पुन्हा धुमश्चक्रीस सुरुवात झाली. १९३२ च्या जानेवारीत मला शिक्षा झाली. दोन वर्षांची होती. धुळे व नाशिक येथे ही शिक्षा दवडली. १९३३ च्या आक्टोबर मध्ये मी सुटलो. १९३४ च्या २६ जानेवारीस पुन्हा पकडलो गेलो व जून १ तारखेपर्यंत धुळ्यास पुन्हा होतो. १९३२ पासून तो १९३४ पर्यतचा हा जो काळ या काळात फुष्कळच कविता मी लिहिल्या. त्यातील बहुतेकांचा अंतर्भाव त्यात झाला आहे. ''बहुदा'' गायीवर लिहिलेले खंडकाव्य ते मात्र यात दिले नाही. दुसरा भाग प्रसिध्द करण्याचा योग आला तर त्यात ते समाविष्ट होईल. २०० पानांचा दुसरा भाग प्रसिध्द करण्याइतकी कविता मजजवळ शिल्लक आहे. हा भाग खपला तर तो दुसराही बाहेर येईल.

माझ्या कवितातील अनेक कवितांचे प्रसंग मोठे सुंदर आहेत. परंतु ते सारे कोठवर देऊ? परंतु प्रत्येक कविता विशिष्ट प्रसंगीच निर्माण झाली आहे. ''स्वातंत्र्याच्या आनंदाची'' जी कविता आहे.तिचा इतिहास मी सांगितलाच ''हे भारतमाते मधुर'' ही जी कविता आहे. ती त्रिचनापल्लीस मी लिहिली. निंबाच्या झाडाखाली मी बसून होतो. वारा वाहात होता. पाने नाचत होती. ती पाने त्यावेळेस अत्यंत सुंदर मला दिसली. ''माझ्या भारतातील झाडांची पानेही किती सुंदर'' हा विचार मनात आला व

''धूलीकण फळ फूल खडा वा असो तरुचे पान
तुझेच अनुपम दाखविती मज पवित्रता लावण्य

असा चरण मी गुणगुणलो व मग सर्व कविता लिहिली. त्रिचवापल्ली व नाशिक येथे असतांना ''या जमिनीवरुन रामलक्ष्मण

सीता'' हिंडली असतील असे विचार नेहमी मनात येत व ती धूळी कपाळी प्रेमाने मी लावीत असे. म्हणून पुढील चरण बाहेर पडले.

''तुझ्या धूळिमाजी वाटे लोळणे सुखाचे
इथे पाय पावन फिरले रामजानकीचे''

फक्त प्रत्येकाने जे करावयाचे ते तनमनबुध्दि ओतुन समाजाचे भले होईल या विचाराने, समाज हा परमेश्वर आहे, त्याची पूजा या क्रियेने होणार आहे. ही भावना ठेवून करावे म्हणजे झाले. आपापल्या कर्माचा अहंकार कोणालाच नको. जो लहानमोठा प्रकाश ठेवलेला आहे. तो त्याने ठेवलेला आहे. कळ त्याच्या हातात आहे. त्याने बटन दाबले तर मी मी म्हणणाऱ्यांच्या बुध्दीचा प्रकाश बंद होईल व त्याच्या मनात आले तर बाळ ध्रुवाला तो वेद बोलावयास लावेल म्हणून

"There is nothing great or small
in the eyes of God"

अशा दृष्टिने वायू पाहणारास मग कोणी अस्पृश्य नाही हिंदुमुसलमान भेद नाही. तो सत्याची सत्यमार्गाने व प्रेममार्गाने, आत्मक्लेशाने होईल तशी सेवा करील.

माझी देशाची सेवा देवाच्या पायावर वाहतांना मला लाज वाटता कामा नये. आज इंग्लंडमधील मुत्सद्दी देशभक्त असतील. परंतु ते हिंदुस्थानला रडवीत आहेत. शेक्सपियर सांगत आहे की "Whatever thou aimst at let at be for thy God, For thy truth, for truth, for thy country" देव, सत्य व देश या तिघांची सेवा ज्या कर्माने होईल ते खरे कर्म. परंतु देव व सत्य यात देश येऊनच जातो. परंतु देशात मात्र देव व सत्य येतातच असे नाही.

माझ्या सेवेची ही भावना आहे. म्हणून असद् रुढी मी मानणार नाही. खोटे भेदभाव पाळणार नाही. ''करु दे रुढीचे कोळसे'' असेच मी म्हणेन. केवळ फासल्या शेंदराचे,लावल्या गंधाचे, देखल्या दंडवताचे देव मला रुचणार नाहीत. हिंदु आणि मुसलमान अशी अलग डबकी मी मानणार नाही. ''प्रेमधर्म''

या कवितेत मुसलमानबाई हिंदुबाईच्या मुलाला खेळवते व त्याचे रडवणे थांबवते.मी पुढील चरण घातला आहे. तो नवपिढीचा बाळराजा, अरुण

''भेदातीत प्रेमा पिडनी बालप्रभु तोषला''

भेदातीत प्रेम पिऊनच तृप्त झाला त्या माता हिंदुत्व व मुसलमानत्व विसरुन गेल्या होत्या व मातृत्व फक्त अनुभवीत होत्या.

सत्याग्रही या खंडकाव्यात ''श्रीमत्कुराण'' असा प्रयोग मी केलेला आहे. आचार्य भागवत मला त्रिचनापल्ली जेलमध्ये म्हणाले, ''श्रीमत्कुराण हा तुमचा प्रयोग वाचून मी सद्गदित झालो.'' जसे श्रीमद्भागवत तसेच श्रीमत् कुराण. कुराण याचा अर्थ हृदय पिळवटून निघालेला उद्गार! कुराण म्हणजे केका आहे. त्या कुराणाला श्रीमत् का लावू नये?

जेथे तेथे मंगल दिसेल तेथे तेथे मान माझी लवो हीच माझी इच्छा आहे. ''मंगलावरच दृष्टि खिळो मंगलाकडेच वळो.'' हीच प्रार्थना आहे. मला एकदा एक स्नेही म्हणाले. ''महात्माजी व रवींद्रनाथ दोघांबद्दल फार पूज्य बुध्दी वाटणारे लोक मी कमी पाहीले. परंतु तुम्ही त्या थोड्या लोकांतील एक आहात. सुखविला व श्रीमंत कवि म्हणुन रवींद्रनाथांना कोणी हिणवतात; रवींद्रनाथ दारिद्र्याशी समरस शरीराने होवू शकत नसतील, परंतु त्यांना त्याची जाणीव आहे. ''उंच जागेवरुन केलेला नमस्कार तुला कसा रे पोचेल'' वगैरे कितीतरी ठिकाणी हृदयातील हे दु:ख त्या थोर ऋषींने बोलून दाखविले आहे. आणि मोठ्यांच्या हृदयातील हे दु:ख त्या थोर ऋषीने बोलून दाखविले आहे. आणि मोठ्यांचा हृदयसागर कोण अजमावणार? महात्माजीना व रवींद्रनाथ म्हणजे सत्याची व सुंदराची पूजा करणारे! परंतु नित्य सुंदर असा तो शिवच आहे. सत्याच्या पूजेने सुंदराच्या पूजेने ते दोघे त्या शिवालाच पूजीत आहेत. भक्ती हा माझ्या जीवनाचा गाभा आहे. माझ्या जीवनातून भक्ती वगळणे म्हणजे प्राणरहीत मढेच ते राहील. मी माझ्या जवळच्या जवळ कधी कधी म्हणत असतो, की देवासाठी जेवढे अश्रु मी ढाळीत आहेत, तेवढे

कशासाठीही ढाळिले नाहीत. वयाच्या चौदाव्या वर्षापासून देवासाठी रडावयाची माझी सुरुवात झाली. ती अजून सुरूच आहे. अगदी लहानपणी मी आईला म्हणत असे "आई मी शेतावर जाउन झाडावर बसेन ध्रुवासारखा होईन." परंतु ध्रुवप्रदाचा तो खरा तो विहंगममार्गी.माझा मार्ग पिपीलिकेचा. शतजन्म रडण्याचा आहे.

"शतजन्म मी रडेन। हासेन हो तदाच॥"

असे माझ्या या संग्रहात न आलेल्या एका कवितेत मी म्हटले आहे. देवाने येउन मला उचलावे. त्या जगत्माउलीने मला कडेवर घ्यावे, कुशीत घ्यावे, निजवावे असे कितीदातरी माझ्या मनात येई व येते. पांघरुणात डोके खुपसून जणु मी आईच्या त्या मोठ्या आईच्या कुशीत आहे अशी भावना करीत असे व करीत असतो. परंतु भावनाच. प्रत्यक्ष तसा अनुभव येत नाही. त्रिचनापल्लीच्या तुरुंगात असतांना रात्री सर्व कैदी निजत. मी रात्रीच्या रात्री रडत काढल्या आहेत. तशाच नाशिकला. तुरुंगाच्या गजाजवळ जाऊन मी आकाशाकडे डोकावत बसे.पाने सळसळली की म्हणावे, "आला वाटते" मी माझा हात गजाबाहेर काढून बसत असे परंतु तास तास हात बाहेर धरुन ठेविला तरी तो येउन माझा हात प्रेमाने थरीत नसे. मला वाटे, माझा हात पापी! मी माझा हात जवळच असलेल्या कंदिलावर धरून पोळून घेत असे! वाटे भिकारी, कवी व तत्त्ववेत्ता या तिघांच्या रुपाने तो प्रकट होतो.

महात्माजींसारखा पुरुष प्रार्थनेनंतर हरीजनांसाठी पै पैसा मागण्यासाठी उभा राहतो तेव्हा कोणाचे हृदय भरुन येत नाही. कोणाचे डोळे ओले होत नाहीत?

"दीनदयाघन परमेश्वर संतरुपाने या भिकाऱ्याच्या रुपाने उभा आहे. माझ्या तरी हृदयात वाटते. रवींद्रनाथांसारखा कवी पाहिला म्हणजे तो अनंतभाव सागर तो नटराजच या मूर्तीच्या रुपाने नाही ना नटला असा भास होतो. आणि आज २२ वर्षे सर्व व्यवहार बंद करुन पांडिचरीस बसलेला तो योगीराणा, तो तत्त्ववेत्ता पुरुष - ते अरविंद त्यांची मूर्ति डोळ्यांसमोर येताच तो कैलासावरचा भोगिराणा तोच तेथे जाऊन नाही ना बसला असा भाव हृदयात येतो

इतर देशातही असे त्या त्या लोकांना उचंबळवणारे महात्मे आहेतच. माझ्या भारतातही आहेत. भारत शब्द उच्चारताच माझे डोळे भरुन येतात. लिहितांनाही मी सद्‌गदित झालो आहे. भारतातील धूळ मला जितकी प्रिय आहे, तितके नाही नाही.मी जमिनीवर बसलो व मला कोणी उठवू लागले तर मला वाईट वाटते. या भारतातील धुळीवरुन राम कृष्ण हिंडले, हरिश्चंद्र श्रियाळ हिंडले, सीता सावित्री फिरल्या. जटायु, मारुती, गुहशबरी हिंडले. येथे ज्ञानेश्वर, चैतन्य, जनाबाई, मुक्ताबाई – हिंडली. भारतमाता! तिच्या डोक्यावर शिवचंद्रमौळीचा हात आहे. तिचे पाय सागर धूत आहे!

तिचे मला सारे सारे प्रिय व पावन आहे. ''महाराष्ट्र'' या शब्दाने मन उचंबळत नाही; परंतु भारताची भव्य कल्पना येताच गहिवर येतो. भारत मातेची गाणी मी रडत रडत व नाचत नाचत लिहिली आहेत. या काही गोष्टी सांगावयाच्या नसतात परंतु सांगितल्याशिवाय राहवत नाही. हा केवळ कलाविलास नाही. मग हा माझा आत्मविश्वास? माझ्या अंत:करणातील हा भक्तिचा रोपा कधी जरा लावतो. कधी संशयाच्या वाऱ्यांनी मोडतो की काय असे वाटते. मनात असलेला तो लबाड कोठे निघून गेला की काय असे वाटते.

''बाल्यापासून
हृदयात बसून
गोष्टी सांगे गोड
पुरवी मनिंचे कोड
कोठे गेला आजी सोडुन माझे धाम''

असे मी रडत रडत विचारु लागतो. परंतु तो पुन्हा हृदयात येतो.

''अति आनंद हृदयि भरला
प्रियकर प्रभु मय हृदयी आला''

किंवा

''रहावया येतसे निरंतर
गोड मुकुंद

किंवा

''प्रभु मम हृदयि आज येणार''

इत्यादी चरणातून व कवितेतून त्याच्या आगमनाची माझी आशा मी प्रकट केली आहे.

भक्तिचा खुंटा हलवून हलवून मी बळकट केला आहे. एककाळ तर असा येऊन गेला की त्यावेळेस मी मनुष्य द्रेष्टा मनुष्य म्हणजे सर्वात नीच प्राणी असे मी म्हणत असे. १९२३-२४ मनुष्य म्हणजे सर्वात ओसाड जीवनाचे। पाहून वाळवंट वाटे. ( Stone Philosophy)

करपून जीव जाई। येई भरुन कंठ
ओसाड जीवनाची। भूमी सदा बघून
वणवेच पेटतात। मनि, जात मी जळून

हेच म्हटले आहे ते काहीच नाही. मनाची काय स्थिती होते ती मी कशी सांगू?

अशी ही निराशा असल्यामुळे सृष्टीतील आनंद मी उपभोगू शकत नाही. सृष्टीत शरद येवो वा वसंत येवो. माझ्या हृदयात सदा शिशिर ऋतूच आहे.

पायांपाशी माणिकमोति
प्रकाशसिंधू सदा सभोती
भिकार तिमिरी केली वस्ती
आणि आता रडणार

ईश्वराच्या जगात अपार आनंद आहे संगीत आहे, सौंदर्य आहे. परंतु मी रडतच राहिलो. सृष्टि मला म्हणते ''हस रे माझ्या मुला'' परंतु मी स्वतःला म्हणतो ''रडे रडे संतत तू रडे रे। न जोवरी त्वत्तनु ही पडे रे'' असे हे चालले आहे.

मी धुतल्या तांदळासारखा निर्मळ केव्हा होईन हीच एक तहान मला आहे. ''केव्हा होइल जीवन माझे निर्मल जलापरी हुरहुर एक असे अंतरी'' तारे पाहिले फुले पाहिली म्हणजे

मी रडतो जळतो. फुलाला हात लावायला? परंतु काळ्या भीषण लाटेवरचा फेस, तसे ते हास्य हृदयातील घोर अशांतता असल्याचे द्योतक असते. खरे हास्य जगात दुर्मिळ, खरी प्रसन्नता जगात दुर्मिळ. खरी प्रसन्नता मिळणे कठीण. त्याला तपश्चर्या लागते.

''प्रसन्नता स्वस्त न वस्तु बापा। प्रसन्नता मुक्तिच मूर्तरुपा
प्रसन्नता वस्तु न मर्त्यभूची। प्रसन्नता सुंदरता प्रभूची
प्रसन्नता बाळ मनोजयाचे। प्रसन्नता बाळ तपोबळाचे
प्रसन्नता संयमन प्रसूती। प्रसन्नता मंगल पुण्य मूर्ति
सदैव सेवारस शांत दांत। त्वदिंद्रियें पाहून विश्वकांत
तदंगी लोभे फिरवी कराते। प्रसन्नता तै वरते तयातें''

अशी प्रसन्नतेची मीमांसा आहे. जो सदैव सेवेत राबत आहे जो भोगांकडे विकारवासनाकडे वळत नाही, अशा पुरुषावर त्या जगन्मातेची कृपा होते. ती विश्वमाता त्या सेवकास प्रेमाने कुरवाळते व म्हणते ''बाळ मजला..हा तू सारखा'' आईची सेवा करावी व मग आईने आपल्या पाठीवर हात फिरवावा त्यावेळेस आपल्या तोंडावर जी सात्विकता असते, प्रसन्नता असते. परमेश्वर ज्याच्या पाठीवर हात फिरवीत असेल त्याची प्रसन्नता व शांती किती अवर्णनीय असतील! रामतीर्थाकडे वादविवाद करण्याच्या इराद्याने पंडित जात; परंतु रामतीर्थांच्या मुखमंडलावरील ते गोड अवर्णनीय हास्य पाहून वादविवाद करणे ते विसरुन जात! देशबंधु दास महात्माजींबद्दल एकदा असेच म्हणाले होते ''महात्माजीजवळ असा युक्तिवाद करुन भांडू असे ठरवून आम्ही जातो. परंतु शेवटी सारे आम्ही ते विसरतो!'' काकासाहेब कालेलकर महात्माजींच्या हास्याला ''मुक्तहास्य'' म्हणत असतात. ते मुक्तपुरुषाचे हास्य आहे. महात्माजींना एकदा एकाने विचारले ''तुमच्यावर इतकी टीका होते,एवढाल्या प्रचंड चळवळी मागे घ्याव्या लागतात, पाउल मागे पडते, तुमची मन:स्थिती कशी असते?'' ते म्हणाले ''आत तंबोरा चाललेला असतो, आत संगीत चाललेले असते'' थोर उद्‌गार! समुद्रावर प्रचंड लाटा हेलकावत आहेत. तरी अंर्तमनाची स्थिती शांत व गंभीर आहे. भगवान विष्णु सहस्त्रफणांच्या शेषावर पडलेले असून शांत मंदस्मित करीत असतात. ''शांताकार भुंजग शयनात '' ही त्यांची स्थिती.

तसेच महात्माजींसारख्यांचे! हजारो कर्माचे वेग सभोवती असतात. होमकुंडासारखे त्यांचे जीवन सदैव धडधडत असते. क्षणाची शांती नाही. उसंत नाही. तरी त्यांच्या तोंडावरचे ते दैवी हास्य, ती निस्तुल व निरुपम प्रसन्नता. ती हृदयातील वीणा तो वेणुनाद ही नाहीशी होत नसतात. ही खरी प्रसन्नता. ती खरी शांती. झऱ्याचे पाणी बुडबुड बुडबुड करीत जसे वसुंधरेच्या बाहेर येत असते, त्याप्रमाणे हृदयातील अपार शांती सर्व इंद्रीय वृत्तीतून, दृष्टीतून, वाणीतून अशा महात्म्यांची प्रकट होत असते. परंतु आम्ही प्रसन्नता कशी मिळवणार?

वृक्षावरचे सुंदर फूल व फळ आपणास दिसते. परंतु वृक्षांची मुळे खाली अंधारात पाण्यासाठी कशी रात्रंदिवस धडपडत असतात. कशी दूरदूर दगडधोंड्यातही मार्ग काढीत जात असतात. ते आपणास दिसत नसते. ओलावा मिळावा, पोषक द्रव्ये मिळावी म्हणून वृक्षाच्या मुळांची केवढी अहर्निश धडपड! त्याप्रमाणे जो मनुष्य रात्रंदिवस धडपडतो, विवेक वैराग्य यांची कास धरतो, इंद्रियांना ध्येयाकडेच खेचून आणतो, अशाला हळूहळू ती प्रसन्नता मिळत असते. महापुरुषाचे हास्य दिसते. परंतु त्याचे अनंत श्रम आपणास कोठे माहीत असतात. त्याची जागरुकता, त्यांचा संयम! शंकरानी दोन डोळ्यांच्या मध्ये तिसरा एक डोळा ठेवला आहे.डोळे वाकडे पाहातील, जीभ वाकडे बोलेल, कान नको ऐकावयास ते जर ऐकतील तर हा तिसरा अग्नीचा डोळा त्यांना जाळावयास तेथे उभा आहे. हा तिसरा डोळा विवेकाचा, संयमाचा होय. संयम ही परमोच्च वस्तू आहे. रवींद्रनाथ म्हणतात "तार जर विण्याच्या खुंट्यांना बांधून घेणार नाही, तर तिच्यातून संगीत निर्माण होणार नाही प्रवाह जर तीरांनी दोहोंकडून बांधून घेणार नाही तर त्याची नदी होणार नाही. ती गंभीर व विशाल होत अनंत सागरास जाऊन मिळणार नाही. वृक्ष जर पृथ्वीशी बांधलेला नसेल तर तो वाढणार कसा? तो पृथ्वीचे बंधन सोडून जर राहू म्हणेल तर मरेल." "संयमाने विकास होतो." वारेमाप कसे तरी राहिल्याने जीवनाचा तरु फोफावणार नाही. विवेकाशिवाय विकास नाही,संयमाशिवाय सौंदर्य व सौभाग्य नाही.

जीवनात संयम आला पाहिजे. रामतीर्थ म्हणत "Purity

must be achieved at any cost" हा पहिला नियम. "Purity is constant sacrifice" पावित्र्य म्हणजे प्रत्येक क्षणाक्षणाला दोष जाळीत राहणे. असा हा यज्ञ अहोरात्र सुरु ठेवणे. आंथरूणे उन्हात टाकितात, बर्नर जाळतात. पावडरी आणतात! परंतु स्वत:तील खळमळ कोण जाळतो! बाहेर साबण लावून फक्त भागत नाही. आतही साबण लावले पाहिजे. येरव्ही राष्ट्रांचा उदय होणार नाही. आज राष्ट्रीय चारित्र्य धुळीत मिळाले आहे. कर्तव्य मनापासून करणारा विरळा! हातात घेतलेल्या कामात मग ते शिकण्याचे असो वा शिकविण्याचे असो, खादी विणण्याचे असो कौन्सिलमध्ये भांडण्याचे असो; त्यात तनमनधन ओतणे ही गोष्ट आपल्याकडे फार दिसत नाही! ज्ञानधन,तपोधन सेवाधन असे लोक दिसत नाही! सारे तात्पुरते पाहणारे. पाश्चिमात्य लोकांचे भोग आपणास दिसतात. परंतु भोगावर राष्ट्रे उभी राहू शकत नाही. ''भोगावरी आम्ही घातला पाषाण'' असे म्हणणारे काहीतरी लोक असल्याशिवाय राष्ट्रे वर येत नाहीत. १८ / १८ तास काम करणारे लोक त्यांच्याकडे आहेत. एकएक गोष्ट घेतील व त्याप्रीत्यर्थ जीवने देतील. मरण म्हणजे पदार्थ ध्रूवाकडे जातील, हिमालय चढतील! एक जर्मन शास्त्रज्ञ प्रयोग करीत होता. स्फोट होऊन त्याचा एक डोळा फुटला, एक हात तुटला तरी तो आनंदाने म्हणाला ''देवा एका डोळ्याने व एकाहाताने तुझे अज्ञात रुप मी शोधीत राहण्याची संधी आल्या तर त्यांचे संधोधन करता करता त्या रोगाने मरुन जाता आले तर धन्य ही कर्तव्यता, ही सेवा त्यांच्याकडे जास्त आहे.

अर्वाचीन चालींना नावे मिळाली आहेत त्यांचे सम्यक् ज्ञान मला नाही माझ्या कविता संमिश्र आहेत. त्यांना कोणते नाव द्यावे मला समजेना. काही गाणी कवितांच्या चालीच्या धर्तीवर आहेत. आपल्याकडे बायकांची काही गाणी त्या चालीची परंतु ती अलीकडे ऐकू येत नाहीशी झाली आहेत. थोडे वृत्ताबद्दल सांगतो. त्या चालीत ऱ्हस्व दीर्घाचा संबंध नसतो. कधी ऱ्हस्व अक्षर लांबवावे लागते. कधी दीर्घ आखडाचे लागते. उदाहरणार्थ या कवितेतील पहिला चरण पहा.

''पतित खिन्न अति दु:खी उदासीन''

यातील ''पतित'' शब्दातील ''ति'' ही उंचवावी लागते. ''दु:खी'' यातील खी व उदासीन यातील दा ऱ्ही दीर्घ अक्षरे जरा ऱ्हस्व करुन म्हणावी लागतील. सारे समजेल आरोहावरोह जसा असतो, तसा आहे येथे. परंतु वाचकाला आपोआपच ते सारे समजेल म्हणून मी नावे चाली वगैरे देण्याच्या भानगडीत पडलो नाही. त्याबद्दल क्षमा करावी.

या काव्यबाळाच्या अंगावर अत्यंत सुंदर बांधणी एका पात्रावर एकच कविता, दुसरी सुरू करावयाची नाही. वगैरे गोष्टींचा बाह्य श्रीमंती पोषाख दिसणार नाही कारण ह्या बाळाची आई सत्याग्रही आहे व म्हणूनच निर्धन आहे. गरिबीच्या संसारात मित्रांजवळ चार चिंध्या जमवून, त्याच शिवून धुवून या बाळाच्या अंगावर तिने घातल्या आहेत. या बाळाचे आंगडेटोपडे पाहू नका. परंतु बाळाचे डोळे पहा. बाळाचे अंतरंग पहा. ते पहाल तर करुणेने, प्रेमाने, वत्सलतेने हे बाळ तुम्ही उचलून घ्याल व प्रेमाने पोटाशी धराल. तुम्ही त्याचा कदाचित मुकाही घ्याल, इतके गोड वाटेल हे बाळ! जरा खिन्न दिसले तरी मधून मधून त्याचे डोळे आशेने कसे चमकतात ते पहा! आणि अंतरंग तर मधुर, प्रेमरस व भावमय असेच दिसेल. या बाळावर जर महाराष्ट्रातील जनता कृपा करील तर या बाळाची तुरुंगातील इतर भावंडेही खुष होतील

गुलाम राष्ट्रांचे राजकारण एकच आहे. ज्या ज्या मार्गाने बळ वाढेल ते ते गुलामराष्ट्रांचे राजकारण असते. खादीने स्वावलंबन येईल का, चला त्या कामात पडू, अस्पृशता दूर करुन घरातील गलामगिरी दूर होईल का चला त्या कामास वाहू. हिंदू मुसलमानांच्या ऐक्याने पाऊल पुढे पडेल का चला त्यांचे सारे करु. दुष्ट रुढी दूर केल्याने हित होईल का चला ते करु. ज्ञान खेड्यांना नाही, चला देऊ व्यायामशाळा नाहीत, चला काढू. समाजात ज्या ज्या गोष्टीची गरज वाटेल ती ती गोष्ट करणे म्हणजे राजकारण होय. प्रत्येकाने आपापल्या अभिरुची प्रमाणे या कामात पडावे. परंतु सारेच फावल्या वेळात पडणारे असे असून चालणार नाही. देवाला वाहिलेली जशी मुले असतात तसे देशाला वाहिलेले तरुण पाहिजे आहेत. समर्थाच्या वेळेस हजारो प्रचारक पायपिटी

करीत अधीर न होता महाराष्ट्रभर पसरले. तसेच दिव्य दृश्य आज पाहिजे आहे. हजारो व्रती तरुणतरुणांची जरूरी आहे. संयमी व सेवोत्कट माणसांची राष्ट्रमाता भीक मागत आहे.मी एक लहानसा जीव आहे. केवळ आशा नाही, केवळ निराशा नाही.या दोघी आलटून पालटून मला मिठ्या मारीत आहेत.

कधी कधी आपल्यावर परमेश्वराची कृपा होत आहे, चित्त स्थिर होत आहे असे वाटू लागते.तो ती आशा जाऊन तुझे चित्त कधीही प्रसन्न, पावन, शांत शांत दांत होणार नाही अशी निराशा वाटते मजवर ईश्वराची कृपा आहे का काय आहे? दोन्ही आहेत. दोहोशिवाय वाढ होणार नाही. परमेश्वरी कृपेचा पाऊस पाहिजे परमेश्वराचि कोपाचे ऊन पाहिजे. पीक भराभर वाढावयास पाऊस व ऊन दोहोंची जरूरी असते. मुलाला कधी रागावून, कधी लोभ दाखवून माता वाढवीत असते. कधी आशा कधी निराशा या मार्गाने मनुष्य मुलाला पुढे नेतो. लाट पडते चढते असे करीत तीर गाठते. ती प्रगति करीत असते. तसेच माणसाचे. मी म्हटले आहे.

करून माता अनुराग राग। विकासावी बाळ मनो विभाग
फुले तरु सेवुन उष्णशीत। जगी असे हीच विकास-रीत।
करुन कारुण्य करुन कोप। विकासवी जीवन-रम्य-रोप

बाळाजवळ करुणा कोप दोहोंची मी मागणी केली आहे. आणि खरे पाहिले तर त्याच्या कोपातही करुणाच असते! तारणारा व मारणारा तो एकच प्रेमळ हात. महात्माजींनी हरिजनांसाठी जो २१ दिवस उपवास केला, तो सुटल्यावर त्यांनी नाशिक तुरुंगात प्यारेलाल यांना पत्र लिहिले होते. त्यात ते म्हणतात

''मी उपवासातून पार पडलो, त्याची कृपा. परंतु मी पार पडलो नसतो तरी त्याचीच कृपा मला घेऊन जाण्यातही त्याची अपरंपार कृपाच असती''

ज्याला ही श्रध्दा आली, त्याला केवढा धीर आला! पतंग उडवणाराच, पतंग खाली खेचतो वर उडवतो. ही खेचाखेच ही ओढाताण पतंग शेवटी वर जावा म्हणूनच असते. आपणही सारे पतंग आहोत तो खेच खेळणारा कोठल्यातरी गचीत बसून

आपणास खेचीत आहे. आपण वर जावे हीच त्याची कृपा आहे. वर जात जात हे पतंग त्या अनंत निळ्या आकाशात मिळावे ही इच्छा आहे. म्हणून जगातील आशा निराशा अनुकूलता वा प्रतिकूलता साऱ्या परिस्थितीतून त्याच्याकडे जावयाचे आहे.

**( 'पत्री' या गाजलेल्या पू. साने गुरुजींच्या कविता संग्रहासाठी लिहिलेली प्रस्तावना. )**

3009

BVBK-0403009

आपणास खेचीत आहे. आपण वर जावे हीच त्याची कृपा आहे. वर जात जात हे पतंग त्या अनंत निळ्या आकाशात मिळावे ही इच्छा आहे. म्हणून जगातील आशा निराशा अनुकूलता वा प्रतिकूलता साऱ्या परिस्थितीतून त्याच्याकडे जावयाचे आहे.

**('पत्री' या गाजलेल्या पू. साने गुरुजींच्या कविता संग्रहासाठी लिहिलेली प्रस्तावना.)**

3009 दिनांक

BVBK-0403009